बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकः बाळासाहेब मस्के

बीड | शुक्रवार, दि. ११ऑक्टोबर२०२४ | वर्षे४रे | अंक६९वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

## आत्मदहन करण्याचा प्रयत्न

औरंगाबाद:राज्याचे पणन, अल्पसंख्याक मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अब्दुल सत्तार यांच्या संपर्क कार्यालयात गुरुवारी दुपारी पाच तरुणांनी डिझेल अंगावर ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. या पाच तरुणांपैकी एकाला छत्रपती संभाजीनगरमधील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पुढील उपचारासाठी हलवण्यात आले. आदिवासी कोळी समाजप्रश्नी आश्वासन देऊनही पाळले नसल्याचा आरोप करत तरुणांनी आत्मदहनाच्या प्रयत्नासारखे पाऊल उचलल्याची प्राथमिक माहिती पुढे येत आहे. राजू दांडगे, दीपक सूरडकर (उंडणगाव), रवींद्र इंगळे, सीताराम पाडळे, दयानंद शेवाळे, दिनेश तांबे, अशी आत्मदहन करण्याचा प्रयत्न करणाऱ्या तरुणांची नावे असून, यातील एकाला छत्रपतीस संभाजीनगरला हलवण्यात आले आहे, अशी माहिती सिल्लोड शहर पोलीस ठाण्याचे निरीक्षक शेषराव उदार यांनी दिली.पाचपैकी दोन तरुणांनी विष प्राशन केल्याची चर्चा सुरू होती.

# पुन्हा एकदा 'मतपेढी' च्या मतपेरणीचा खेळ!

मेळाव्यातून काय बोलणार राज्याचे लक्ष



## राजकारण: मुंडे बहीण-भाऊ आणि जरांगेंचा दसरा मेळावा

मराठवाड्यातील प्रचाराची दिशा ठरणार

मेळाव्याच्या गर्दीचा उच्चांक होणार रेकॉर्डब्रेक

निवडणुकीची प्रचारदिशा स्पष्ट होण्याचे संकेत



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात पंकजा मुंडे व धनंजय मुंडे यांचा एकत्रित दसरा मेळावा आणि याच जिल्ह्यातील नारायण गड येथील मनोज जरांगे यांचा विजयादशमीच्या महोत्सवातील भाषणांवर मराठवाड्यातील विधानसभा निवडणुकीची प्रचारदिशा स्पष्ट होण्याची शक्यता राजकीय पटलाववर व्यक्त केली जात आहे.परळी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंकजा मुंडे यांच्या दसरा मेळाव्यास धनंजय मुंडे उपस्थित राहणार आहेत. तसे त्यांनी समाज माध्यमांवर अधिकृतपणे जाहीर केले. दसरा मेळाव्याची तयारी जशी परळीसह मराठवाड्यात सुरू झाली आहे, तशीच ती नारायण गडावरही सुरू झाली आहे. मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे या वर्षी दसरा मेळावा घेणार असल्याने पुन्हा एकदा ' मतपेढी' च्या मतपेरणीचा खेळ मराठवाड्यात रंगेल असा अंदजा वर्तवला जात आहे.


पान २ वर...

## छगन भुजबळ यांचे निवृत्तीचे संकेत

निर्णय: सामाजिक कार्याची जबाबदारी सोपवली

नाशिक/पुण्यभूमी प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी आपणास काही काळ आराम करायचा असल्याचे सांगून अप्रत्यक्षपणे निवृत्तीचे संकेत दिले आहेत. सामाजिक कार्याची जबाबदारी मुलगा पंकज आणि पुतण्या समीर यांनी घ्यावी, राजकारणात स्वत:च्या निर्णय क्षमतेवर पुढे जावे, असे आवाहनही केल्याने भुजबळ हे खरोखर गंभीर आहेत की निवडणुकीच्या तोंडावर नेहमीप्रमाणे भावनिक साद मतदारांना घातली, याची चर्चा रंगली आहे.घरातील एखादा सदस्य निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्यास छगन भुजबळ हे कायमच मतदारांच्या भावनिकतेला हात घालतात. त्याचाच अनुभव नांदगाव येथे समीर भुजबळ यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात पुन्हा एकदा आला. शिवसेनेच्या (शिंदे गट) ताब्यातील नांदगाव मतदारसंघात यापूर्वी भुजबळ यांचे पुत्र पंकज यांनी सलग दोनवेळा प्रतिनिधित्व केले आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत या जागेवर भुजबळ यांच्याकडून पुतणे तथा माजी खासदार समीर भुजबळ यांना मैदानात उतरविण्याचे नियोजन करण्यात येत आहे. याच कारणास्तव समीर यांचा वाढदिवस भुजबळ कुटुंबीयांनी नांदगाव मतदारसंघात साजरा केला.राज्यासह नाशिक जिल्ह्याची तुमच्यावर मोठी जबाबदारी आहे. उभयतांनी सामाजिक कार्य पुढे न्यावे. काहीही करण्यापूर्वी आपणास विचारण्याची गरज नाही.



छगन भुजबळांची राजकीय कारकिर्द नेहमीच आक्रमकतेकडे झुकलेली असते. परंतु, जेव्हा काही वेगळे प्रसंग उद्भवतात, तेव्हा भुजबळ हे नेहमीच भावनिक आधारांवर मतदारांना आकृष्ट करण्यासाठी आक्रमतेला मुरड घालतात. निवडणुकीत त्याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष त्यांना फायदाच मिळतो. आगामी निवडणुकीत तशी परिस्थिती असल्याने नम्रतेकडे झुकून भावनिक आधार त्यांनी घेतला असावा.
– संदीप डोळस
सामाजिक विश्लेषक

आपणास काही काळ आराम करायचा आहे, असे नमूद केले. या भावनिक आवाहनातून भुजबळांना नांदगावमध्ये पुन्हा जम बसवायचाय की राजकारणातून निवृत्त व्हायचे आहे, याचे ठोकताळे राजकीय वर्तुळात मांडले जात

पान २ वर...

## केजमध्ये निश्चित लढणार अन् जिंकणार!

पडघम:डॉ.अंजली घाडगेंनी पुकारला एल्गार!

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज विधानसभा मी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि महवुकास आघाडी कडून निवडणूक लढविणार असून निवडून येण्याचा आत्मविश्वास त्यांनी कार्यकर्ता मेळाव्यात कार्यकर्त्यांशी हितगुज साधताना केला. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या के ज विधान सभेच्या नेत्या डॉ. अंजलीताई घाडगे यांनी दिनांक ९ ऑक्टोबर



रोजी केज येथे त्यांच्या संपर्क कार्यालयाच्या प्रांगणात महिला व पुरुष कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित केला होता.

या मेळाव्याला जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्ष राधाताई सकपाळ, केज नगर पंचायतचे माजी सभापती आणि खा. बजरंग सोनवणे यांचे निकटवर्तीय कपिल मस्के हे उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ. अंजलीताई घाडगे म्हणाल्या की, अनेक वर्ष केज मतदार संघात एकच परिवारात सत्तेत आहे.

पान २ वर...

## पाच वर्षीय मुलीवर शिक्षकाचा अत्याचार

जिल्हा हादरला:मानवतेला काळीमा फासणारी घटना

सिरसाळा/पुण्यभूमी प्रतिनिधी

बाप देशाच्या सिमेवर देश सेवा करतोय आणि नराधम शिक्षक त्याच्या लहानशा पाच वर्षाच्या मुलीवर अत्याचार करतोय ,हि मानवतेला काळीमा फासणारी घटना सिरसाळा परिसरातील एका गावातील कुटुंबा सोबत घडली आहे ,या विषयी सविस्तर वृत्त असे कि,सिरसाळा परिसरातील गोदाकाठा वरील एका गावातील चिमुकली एलकेजी वर्गात सोनपेठ (जिल्हा परभणी ) येथील एका इंग्लिश स्कूल मध्ये शिक्षण घेते,आपल्या सिरसाळा परिसरात असणा-या गावातून इतर मुली सोबत ती स्कूल बसने येजा करते , दिनांक ५ रोजी किंवा त्या पुर्वी पासुन तिच्या वर सदरील शाळेतील नराधम शिक्षकाने बाथरुम मध्ये नेऊन तिच्यावर अत्याचार केला, पिडित मुलगी हि आजारी असल्या सारखी दिसत असल्याने तिच्या आईने तिला वेवस्थीत पाहिले असता हा प्रकार उघडकीस आला , पिडितास दवाखान्यात तपासले असता डॉक्टरांनी अत्याचार झाल्याचे सांगितले आहे. ह्या घटनेने संबंध जिल्हा हादरला आहे. बदलापूर येथील घटना ताजी असतांनाच अशी घटना या ठिकाणी देखील घडली आहे .या

पान २ वर...

## केंद्र सरकारची ग्रिस्टॅक योजना महाराष्ट्रात

धनंजय मुंडे:विद्यापीठांच्या प्रकल्पग्रस्तांच्या पदभरतीस मंजुरी

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचा दुसरा टप्पा राबवणे केंद्र सरकारच्या ग्रिस्टॅक या योजनेस मंजुरी देणे राज्यातील कृषी विद्यापीठांमधील प्रकल्पग्रस्तांच्या पदभरतीस मंजुरी आणि बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन केंद्रास अतिरिक्त निधी देण्यास आज-गुरुवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेला राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आल्याची माहिती कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे

राज्यातील निवडक जिल्ह्यातील शेतकऱ्यांना हवामान बदलांमुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास सक्षम करणे आणि शेती व्यवसाय



किफायतशीर करण्यास सहाय्य करणे या उद्देशाने राज्यात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प राबविण्यात येत आहे. पहिल्या टप्प्यात ५२८४ गावांचा समावेश होता. दुसऱ्या टप्प्यात सद्यस्थितीत समाविष्ट असलेल्या १६ जिल्ह्यांसह विदर्भातील उर्वरित नागपूर भंडारा गोंदिया चंद्रपूर व गडचिरोली आदी २१ जिल्ह्यातील ६९५९ गावांचा समावेश करण्यात आला आहे. या प्रकल्पासाठी अंदाजित खर्च ६ हजार कोटींचा असून त्यासाठी जागतिक बँकेचे अर्थसहाय्य घेण्यात येणार आहे.

राज्यातील कृषि क्षेत्रात डिजिटल सेवांचा वापर करुन शासनाच्या विविध योजनांचा जलद गतीने व परिणामकारकरित्या लाभ शेतकऱ्यांना देणे सुलभ व्हावे याकरीता केंद्र शासनाची ग्रिस्टॅक डिजिटल

पान २ वर...

## केजला लागलेली कीड उखडून पडणार

रणसंग्राम:आ.नमितांना जिंकून येणे कठीण!

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज विधानसभा मतदारसंघ आमदार हे छत्रपती शिवाजी महाराज चौक ते डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक असे शहरातील चौकाचे नाव आहे आमदारा नमीताताई अक्षय मुंदडा आमदार असून ऐकेरी नाव घेत आहेत याचा जाहीर निषेध व्यक्त केला जात आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौक रीगरोड या ठिकाणी सौजन्य अक्षय मुंदडा मीत्रमडळ म्हणून नाव टाकतात मुंदडा कुंटुबातील प्रत्येक व्यक्ती महापुरुषांचा अनादर का



करत आहेत तसेच ग्रामपंचायत कार्यालयामध्ये महापुरुषाच्या शेजारी पत्नीचे व स्वतःचे फोटो लाऊन,नाव ऐकेरी घेऊन आनादर करतात उदरी

पान २ वर...

अखेरचा सलाम | महाराष्ट्रासह देशही हळहळला

## उदार अंत:करणाच्या उद्योजकाला निरोप

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

यशस्वी उद्योजकाचं उत्तम उदाहरण, परोपकार वृत्ती असणारे दयाळू व्यक्तीमत्त्व, प्राणीमात्रांवर पराकोटीचं प्रेम आणि माणसातलं माणूसपण जपणाऱ्या रतन टाटा अनंतात विलीन झाले. वरळीतील स्मशानभूमीत शासकीय इतमामात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. रतन टाटा यांना अखेरचा निरोप देण्याकरता देशभरातील असंख्य लोक मुंबईत दाखल झाले होते. पारशी समाजाच्या विधीनुसार त्यांचावर अंत्यसंस्कार करण्यात आले. विद्युत स्मशानभूमीत त्यांनी अखेरचा निरोप दिला.

टाटा यांचे पार्थिव दक्षिण मुंबईतील



नरिमन पॉइंट येथील नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ट्स (छउझ-) येथे गुरुवारी सकाळी साडेदहा ते दुपारी चार या वेळेत अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले होते. त्यानंतर त्यांचे पार्थिव अंत्यसंस्कारासाठी वरळीतील

पान २ वर...

## दक्षिण कोरियाच्या हान कांग यांना नोबेल

सन्मान /हृदयाला भिडणारी गद्यातत्मक काव्य मांडणी

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

दक्षिण कोरियाच्या लेखिका हान कांग (वय ५३) यांना गुरुवारी साहित्याचे नोबेल जाहीर झाले. 'त्यांच्या हृदयाला भिडणाऱ्या काव्यात्मक गद्यांतून (पोएटिक प्रोज) इतिहासातील वेदना दिसतात. मानवी जीवन किती अस्थिर आहे, हे त्यातून व्यक्त होते,' असे नोबेल समितीने म्हटले आहे.

स्वीडिश ॲकॅडमीच्या नोबेल समितीचे कायमस्वरूपी सचिव मॅट्स माम यांनी पुरस्काराची घोषणा केली. नोबेल समितीचे अध्यक्ष अँडर्स ऑल्सन यांनी हान यांचे अभिनंदन केले आहे.



स्त्रियांची असुरक्षितता, स्त्रियांचे जीवन यांच्याबद्दल कायमच हान सक्रिय असतात, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली. ते म्हणाले, 'शरीर आणि आत्मा, मृत आणि यांना जोडणाऱ्या दुव्याची विशिष्ट अशी समज त्यांना आहे. त्याची मांडणी काव्यात्मक आणि प्रयोगात्मक शैलीतून करण्याचे त्यांचे तंत्र समकालीन गद्यांमध्ये अगदी नावीन्यपूर्ण असे आहे.'हान या हृदयाला भिडणारे गद्यात्मक काव्याची मांडणी करतात. ते अतिशय नाजूक आणि प्रसंगी कठोर असते. काही वेळा ते अतिवास्तववादीदेखील असते,' अशी प्रतिक्रिया साहित्य क्षेत्रातील नोबेल पुरस्कारासाठीच्या समितीच्या सदस्य ॲना कॅरिन पाम यांनी म्हटले आहे.नोबेल पुरस्कार मिळविणाऱ्या हान या पहिल्या आशियायी

पान २ वर...

## जीवन त्यांना कळले हो

रतन टाटा यांचे निधन हे केवळ एका उद्योगपतीचे जाणे नाही. संस्कृतीच्या मूल्यसाखळीतील महत्त्वाचा दुवा त्यांच्या निधनामुळे आपल्यातून नाहीसा झाला आहे

रतन टाटा यांचे निधन हे केवळ एका उद्योगपतीचे देहावसान नाही. ते त्यापेक्षा अधिक काय आहे हे समजून घेण्यासाठी रतन टाटा यांनी काय काय केले यापेक्षा मुळात काय केले नाही, याचा विचार करावा लागेल. जगातील पहिल्या पाच–दहा धनाढ्यांत आपले नाव असावे यासाठी रतन टाटा यांनी कधी प्रयत्न केले नाहीत. टाटा समूह केवळ कमाई या मुद्द्यावर जगात वा देशात सर्वात बलाढ्य उद्योगसमूह व्हावा यासाठी त्यांनी कधी प्रयत्न केले नाहीत. अन्य स्पर्धकांच्या तुलनेत आपल्या कारखान्यास, प्रकल्पास अधिकाधिक मंजुऱ्या मिळाव्यात यासाठी रतन टाटा यांनी कधी प्रयत्न केले नाहीत. सिंगापूर एअरलाइन्ससमवेत टाटा समूहाचा विमान सेवा कंपनीचा प्रकल्प जेव्हा दोन राजकारण्यांच्या विरोधामुळे मागे पडत गेला तेव्हा त्या राजकारण्यांविरोधात पंतप्रधानांकडे तक्रार करण्याचा उद्योग रतन टाटा यांनी केला नाही. त्यांनी प्रकल्प बाजूला ठेवला. मुंबईत स्वत:च्या मालकीचे बहुमजली इमले उभारून आलिशान ऐषारामी जीवन जगावे असे टाटा यांना वाटले नाही की अन्य तृतीयपर्णी उद्योगपतींप्रमाणे पैसा फेकत पार्ट्या देत स्वत:च्या प्रसिद्धीच्या टिमक्या त्यांनी कधी वाजवल्या नाहीत. यातील काहीही रतन टाटा यांनी केले नाही. करावे असे त्यांना कधी वाटलेही नाही. हे वा यातील काही न करताही या देशात सात्त्विकतेने संपत्ती निर्मिती होऊ शकते आणि सभ्य, सुसंस्कृत, सालस, सोज्वळतेने राहता येते हे रतन टाटा यांनी दाखवून दिले. या साऱ्या गुणांवरच्या विश्वासास आणि भवितव्यास रतन टाटा यांच्या निधनाने तडा जातो. म्हणून रतन टाटा यांचे निधन हे केवळ एका उद्योगपतीचे जाणे नाही. संस्कृतीच्या मूल्यसाखळीतील महत्त्वाचा दुवा त्यांच्या निधनामुळे आपल्यातून नाहीसा झाला आहे.

आडनाव टाटा असले तरी ते सोन्याचा वा चांदीचा चमचा मुखी घेऊन जन्मास आले नाहीत. टाटा उद्योगसमूहाचे संस्थापक जमशेटजी टाटा यांना दोन चिरंजीव. दोराब आणि रतन. पण या दोघांसही अपत्यप्राप्ती झाली नाही. टाटा स्टील, ताज हॉटेल आदी थोरल्या टाटांच्या स्वप्नांची पूर्तता दोराब यांनी केली. त्यांचे कनिष्ठ बंधू 'सर'की प्राप्त रतन टाटा यांस कला, संस्कृती यात अधिक रस होता आणि मोहंजोदडो येथील सिंधू संस्कृतीचे उत्खनन असो वा गोपाळ कृष्ण गोखले यांचा भारत सेवक समाज वा महात्मा गांधी यांचा दक्षिण अफ्रिकेतील संघर्ष! या सर्वांस सर रतन नेमाने रसद पुरवत राहिले. मधल्या काळात दोराबजी यांच्या मदतीस आर. डी. टाटा फ्रान्समधून आले. टाटा साम्राज्याच्या विस्तारात या 'आरडी' यांचे पुत्र जेह ऊर्फ जेआरडी यांना नंतर मोठी संधी मिळणार होती. जेआरडी हेही नि:संतान होते. त्या काळात रतन यांच्या कुटुंबाने पारसी अनाथाश्रमातून एक चुणचुणीत मुलगा दत्तक घेतला. ते नवल टाटा. म्हणजे आज निवर्तलेल्या रतन टाटा यांचे वडील. त्यांना टाटा साम्राज्याचे सारथ्य करण्याची संधी मिळाली नाही. ती बऱ्याच प्रतीक्षेनंतर का असेना पण रतन टाटा यांस मिळाली. वास्तविक अमेरिकेत असताना रतन टाटा यांना 'आयबीएम' या बलाढ्य कंपनीचे बोलावणे होते. त्यांनी ते नाकारले आणि त्याऐवजी भारतात परत येऊन टाटा समूहाच्या पोलाद कारखान्यात एखाद्या अन्य कुशल कामगाराप्रमाणे नोकरी पत्करली. तेथून पुढे कित्येक वर्षे अन्य कोणत्याही कर्मचाऱ्याइतकेच स्थान रतन यांचे टाटा समूहात होते. पुढे काही काळासाठी त्यातही खंड पडला कारण आपल्या गंभीर आजारग्रस्त आईच्या शुश्रूषेसाठी रतन टाटा तिच्यासमवेत अमेरिकेत राहू लागले. या काळात टाटा समूहाने आपले परंपरागत उद्योग सोडून नव्या काळासाठी कसे तयार व्हायला हवे, याचे अत्यंत सविस्तर, दीर्घ टिपण त्यांनी तयार केले आणि तोपर्यंत टाटा समूहाची धुरा ज्यांच्याकडे आलेली होती त्या जेआरडींस ते पाठवून दिले.

आणि तरीही या सगळ्यापासून 'इदं न मम' म्हणत रतन टाटा दूर राहिले. हे त्यांचे खास टाटापण. सर्वात असूनही कशातच नसणारे! ''जीवन त्यांना कळले हो, मीपण ज्यांचे पक्व फळापरि सहजपणाने गळले हो'', या बाकिबाब बोरकरांच्या शब्दांचे यथार्थ वास्तव रूप म्हणजे रतन टाटा. आज त्यांचे अस्तित्वच 'मी पणा'च्या पक्व फळाप्रमाणे निघून गेले. त्यांच्या स्मृतीस 'लोकसत्ता' परिवारातर्फे आदरांजली.

# डॉ.विजयकुमार देशमुख बहुआयामी व्यक्तिमत्त्व

नेतृत्वाचा वारसा अनेकांना चालत येतो. या नेतृत्वात संवेदनशीलपणा असेलच असे नसते. परंतु ज्याला नेतृत्वाचा वारसाही नाही आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर ज्याला कळवळा येतो असे नेतृत्व हे अपवादानेच उदयाला येते. सर्व सामान्यांतुन उदयास आलेल्या नेतृत्वामध्ये एक प्रकारचे संवेदनशीलता भरलेली असतेच त्याचबरोबरीने आक्रमताही तेवढ्याच तीव्रतेने असते हे दिसुन येते. याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे प्रा.डॉ.विजयकुमार देशमुख सर यांच्या रूपाने पहावयास मिळते. वेगवेगळ्या माध्यमातून व एक ध्येय समोर ठेवून सर्वसामान्यां प्रती असलेल्या जिव्हाळा अनेक आंदोलने व अनेक प्रश्नांची सोडवणुक करताना त्यांच्यातील संवदेनशीलतेचा प्रत्यय नेहमीच पहावयास मिळाला. तसेच परळी शहराच्या सामाजिक, धार्मिक शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात अतुलनिय असणारे प्रा.डॉ.विजयकुमार देशमुख सर यांचा आज वाढदिवस आहे. त्या निमीत्त त्यांना मन:पुर्वक हार्दिक शुभेच्छा.

प्रा.डॉ.विजयकुमार देशमुख हे त्यांच्या संपर्कात आलेल्या कार्यकर्त्यांमध्ये सर या नावानेच परिचीत आहेत. माजी आमदार कै.वामनराव देशमुख यांच्या माध्यमातून स्वत:च्या सामाजिक व राजकिय कारर्किदीला त्यांनी



सुरूवात केली. विद्यार्थ्यांचे अनेक प्रश्न , छोट्या–मोठ्या अडीअडचणी सोडवत सोडवत श्री देशमुख सर यांनी मोठ–मोठी आंदोलनेही केली आहेत. शहरात आपल्या कार्य कर्तुत्वाने स्वत:चा ठसा उमटवला. केवळ प्रसिद्धीच्या झोतात राहण्यापेक्षा त्याने लोकांचे प्रश्न सोडवण्याला अधिक महत्व सरांनी दिले. परळी नगर परिषदेचे नगरसेवक पद त्यांच्याकडे आल्यानंतर त्याच्यातील नेतृत्व गुणांचा खरा विकास झालेला आढळून येतो. न्याय मागण्यासाठी त्याचा आक्रमकपणा अगदी उफाळून आलेला दिसतो. सामान्य घरातील युवकांना चळवळीमध्ये आणुन त्याने त्याच्यातील स्वाभीमान सरांनी जागृत केला. वेळप्रसंगी अनेक अडचणीचा सामनाही त्याने केला. परंतु न्याय मिळवून देताना मात्र त्यांनी कशाचाही विचार केलेला नाही. युवकांचे मोठे संघटन करण्याचे कौशल्य त्यांच्या अंगात जन्मजात दिसुन येते. युवकांच्या प्रश्नांची जाण त्यांना असते. युवकांप्रती त्यांची असलेली आत्मयीतता नेहमीच दिसुन येते. त्यामुळेच त्याच्या जवळ आलेला युवा कार्यकर्ता त्यामुळेच त्याच्या जवळ असलेला एकही कार्यकर्ता त्याच्या पासुन दुर गेलेला दिसुन येत नाही. माजी आमदार कै.वामनराव देशमुख यांची विचार सरणी घेवून सर्व सामान्यांचे प्रश्न सोडविताना त्यांच्यातील संवेदनशील मन मात्र त्याने जपुन ठेवले. त्याच्या या गुणामुळेच अनेकांना प्रा.डॉ.विजयकुमार देशमुख सर सर्वांना आपलेसे वाटतात. अनेक जण त्यांना जवळचे समजतात आणि ते लोकांची कामे तेवढ्याच आत्मयीतेने करताना दिसतात. आजही कसलेही पद नसतांनाही सर्वसामान्यांची कामे ते तळमळीने करत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सर्वच स्तरात त्याचे नाव आदराने घेतले जाते. मित्र परिवाराच्या माध्यमातून वेगवेगळे उपक्रम राबविणे , शालेय, महाविद्यालयीन युवकांसाठीचे उपक्रम राबविणे, बेरोजगारांचे प्रश्न सोडविणे, सर्व सामान्यांच्या नागरी समस्या सोडविणे याच बरोबर पक्ष संघटन मजबुत करण्यासाठी सतत कार्यरत राहणे हे त्याच्या व्यक्तीमत्वाचे विशेष पैलु आहेत.प्रा.डॉ.विजयकुमार देशमुख यांचा शहरात सांस्कृतिक वातावरण तयार व्हावे यासाठी त्यांचा विशेष प्रयत्न आहे. कला, साहित्य, शिक्षण, समाज या सर्वच क्षेत्रात त्याचा वावर आढळतो. प्रत्येक क्षेत्रातील लोकांशी वागताना त्यांचा नम्रपणा नजरेत भरणारा असतो. त्यामुळे प्रत्येक जण त्याच्याकडे आदराने पाहतो. वेळप्रसंगी नम्र असणारे सर आक्रमकही होताना दिसतात. त्यांच्यातील संवेदनशीलता हीच त्याची खरी ओळख आहे. त्याच्या या गुणांची दिवसेंदिवस वाढ व्हावी, त्याचे नेतृत्व अधिकाधिक बळकट व्हावे त्याच्या सर्व संकल्पना यश मिळावे व त्याच्याकडून सतत अखंडीत अशी जनसेवा घडावी हीच त्याच्या वाढदिवसानिमीत्त प्रभु वैद्यनाथाच्या चरणी नम्र प्रार्थना आहे.

बालाजी ढगे मो.९८९०३३८६९४,परळी वैजनाथ



## प्रा.डॉ.महादेव सुवर्णकार यांच्या संशोधनास यु–के कडून पेटेंट

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज येथीलबाबुरावजी आडसकर महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठ येथील प्राध्यापकांच्या संशोधनास यु–के सरकारचे पेटेंट बाबुरावजी आडसकर महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. महादेव सुवर्णकार व रसायनशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील प्रा. डॉ. के. एम. गरडकर, डॉ. नाना गावडे व डॉ. संतोष बाबर, यांच्या संशोधनातून जलशुद्धीकरणासाठी वापरण्यात येणारे नवीन उपकरण हे नॅनो मटेरियल लॅबोरेटरी मध्ये तयार करण्यात आलेले आहे. त्या उपकरणासाठी त्यांना यु–के सरकार मार्फत पेटंट मंजूर झालेले आहे. या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे भाऊसाहेब पाटील अध्यापक महाविद्यालयात प्रा डॉ महादेव सुवर्णकार यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी डॉ हनुमंत सौदागर,प्रा डॉ नागेश कराळे, प्रा डॉ श्याम सरसरे,प्रा अशोक घोडके,सुजित नाईकवाडे आदींच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सध्या जलद गतीने वाढणारे औद्योगिकीकरण आणि त्या मध्ये रसायने आणि नैसर्गिक संसाधनांचा व्यापक वापर केला जातो. कंपनी मधून बाहेर पडणारे नॉन बायोडिग्रेडेबल सेंद्रिय पदार्थ असलेले औद्योगिक सांडपाणी जे सरळ पुढे नद्या, नाले किंवा समुद्राच्या पाण्यात सोडले जातात. त्या मुळे जलप्रदूषणासारख्या प्रमुख जागतिक समस्या डोके वर काढत आहेत. अशा समस्या टाळण्यासाठी औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया करून शुद्ध करणे गरजेचे आहे. औद्योगिक सांडपाणी शुद्ध करण्या साठी नॅनोमटेरियल फोटोकॅटलिस्ट हे एक प्रभावी आणि आर्थिक दृष्ट्या सोईस्कर पर्याय आहे. प्रा डॉ. के.एम. गरडकर, प्रा. डॉ. महादेव सुवर्णकार आणि सहकार्यांनी नॅनोमटेरियल फोटोकॅटलिस्ट मध्ये बरेच आंतरराष्ट्रीय शोध निबंध प्रसिद्ध केले आहेत. भविष्यात देखील सोप्या हरित पद्धतीने आणि सूर्य प्रकाशामध्ये काम करणारे नॅनोमटेरियल फोटोकॅटलिस्ट तयार करून पर्यावरणाची हानी टाळता येईल असे मत सुवर्णकार यांनी व्यक्त केले

## पान एक वरून

### पुन्हा एकदा 'मतपेटी' च्या

दसरा मेळाव्यातून राजकीय दिशा देण्याची कार्यशैली बीड जिल्ह्यात गेल्या अनेक वर्षापासून आहे. गोपीनाथ मुंडे यांनी ही परंपरा सुरू केली. २०१४ नंतर बीड जिल्ह्यातील सावरगावघाट येथे दसरा मेळावा घेण्यास पंकजा मुंडे यांनी सुरुवात केली. तत्पूर्वी भगवानगडावर हा मेळावा घेतला जात असे. या मेळाव्यात झालेल्या वादानंतर कोणत्याही राजकीय पक्षाने भगवानगडावर मेळावा घेण्यास मज्जाव करण्यात आला. सावरगाव घाट येथील मेळाव्यातून २०१४ ते २०२४ या दहा वर्षात पंकजा मुंडे यांच्या वक्तव्यामुळे राजकीय पटलावरील सुंदोपसुंदी समोर येत असे.,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नाव न घेता त्यांच्यावरील रोष व्यक्त करणाऱ्यांची मोट या मेळाव्यातून बांधण्याचा प्रयत्न होत असे. मात्र, २०२३ पासून यात मोठे बदल झाले. धनंजय मुंडे यांनी पंकजा मुंडे यांनी आपले राजकीय वैर संपवून बहीण – भावाचे नातेच राजकीय पटलावर असेल असे चित्र संकेत दिले. तत्पूर्वी राज्याच्या राजकारणात ' पहाटेचा शपथविधी' झाला होता. तेव्हा त्यातही धनंजय मुंडे यांची महत्त्वपूर्ण भूमिका वठवल्याची चर्चा राजकीय पटलावर होती. अजित पवार यांनी भाजपबरोबर यावे या प्रक्रियेमध्ये धनंजय मुंडे यांची बऱ्याच हालचाली केल्या होत्या, हेही बीडमधील राजकीय जाणकारांना माहीत आहे. त्यामुळे या वेळी परळी विधानसभा निवडणुकीमध्ये ' कमळ' हे चिन्ह असणार नाही. या पार्श्वभूमीवर होणाऱ्या दसरा मेळाव्यास धनंजय मुंडे हजर राहणार आहेत.लोकसभा निवडणुकीपूर्वी मराठवाड्यात ' मराठा विरुद्ध ओबीसी' असे चित्र राजकीय पटलावर निर्माण झाले. जरांगे यांनी महाविकास आघाडीशी छुपी युती केल्यामुळे भाजपला मराठवाड्यात फटका बसल्याचा आरोप अलिकडेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला होता. त्यामुळे जरांगे आणि मुंडे बहीण– भाऊ दसरा मेळाव्यात कोणत्या भूमिका व्यक्त करतात, यावर मराठवाड्यातील विधानसभा निवडणुकीची प्रचार दिशा ठरेल असे सांगण्यात येत आहे.

### छगन भुजबळ यांचे निवृत्तीचे

आहेत.लोकसभा निवडणुकीपासून भुजबळ हे नाराज असल्याचे मानले जाते. मात्र, आता ते येवल्यात विधानसभेच्या तयारीला लागले आहेत. मागील दोन दशकांपासून या मतदारसंघावर त्यांचे एकखांबी वर्चस्व आहे. निवृत्तीच्या संकेतामुळे या मतदारसंघाची जबाबदारी ते कुणाकडे देतील, अशा चर्चांना उधाण आले आहे. मात्र येवल्यात भुजबळ हेच स्वत: उमेदवार असतील.नांदगावमध्ये पुतण्या समीरला पाय रोवता यावेत म्हणून त्यांनी नेहमीप्रमाणे मतदारांना भावनिक साद घातल्याचे मानले जाते. समीर भुजबळ हे २००९ मध्ये नाशिकमधून लोकसभेत पोहोचले होते. या निवडणुकीवेळी मराठा–ओबीसी वाद उफाळून आला होता. तेव्हाही छगन भुजबळांनी आपला पुतण्या तुमच्या पदरात टाकत आहे, त्याला सांभाळून घ्यावे, असे आवाहन नाशिककरांना केले होते.

### केजमध्ये निश्चित लढणार

मात्र या मतदार संघाचा विकास मात्र ते करू शकले नाहीत. अशा नाकर्त्या आमदारांना पुन्हा मतदार स्वीकारणार नाहीत. तसेच वारंवार एकाच घरात सत्ता देण्याच्या मनस्थितीत येथील मतदार नाही. त्यांना मतदार संघात बदल हवा आहे. ज्या प्रमाणे लोकसभेला राज्यातील आणि जिल्ह्यातील मतदारांनी निवडणूक हातात घेतली आणि बीड जिल्ह्यातून धनशक्ती आणि दादागिरी मोडीत काढली. त्याच प्रमाणे आता शरदचंद्र पवार, सुप्रियाताई सुळे, जयंत पाटील, खा. बजरंग बप्पा सोनवणे यांच्यासह महाविकास आघाडीचे नेते नाना नाना पटोले, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, आ. संदीप भैय्या सोनवणे यांच्यासह महाविकास आघाडीचे नेते नाना नाना पटोले, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, आ. संदीप भैय्या क्षिरसागर यांच्या विचारांचा उमेदवार म्हणुनी विधान सभेच्या निवडणुकीत सामोरे जावून निवडून येणार असल्याचा आत्मविश्वास त्यांनी व्यक्त केला.या कार्यकर्ता मेळाव्याला केज तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख महिला आघाडीसह पुरुष कार्यकर्ते उपस्थित होते.

### पाच वर्षीय मुलीवर शिक्षकाचा

प्रकरणी पोस्को/बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार पिडितेच्या आईच्या फिर्यादीवरून सोनपेठ पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे .घटनेची माहिती समजताच पोलीस अधीक्षक रवींद्र परदेशी, अप्पर पोलीस अधिक्षक यशवंत काळे, उपविभागीय पोलीस अधिकारी समाधान पाटील, पोनि. सुर्यमोहन बोलमवाड आदींनी घटना स्थळी भेट दिली.या प्रकरणात संबंधित पीडित मुलीच्या आईने तक्रार दाखल केलेल्या प्रकरणात सोनपेठ पोलीस ठाणे व परभणी जिल्हा पोलीस प्रशासन यांनी सहा वेगवेगळ्या विषय तज्ञांचे पथके नेमून तपास यंत्रणा कार्यरत केलेली आहे. या प्रकरणाचा तपास सोनपेठ पोलीस ठाणे पोलीस निरीक्षक बोलमवाड व सर्व वरिष्ठ पोलीस अधिकारी,कर्मचारी, तपास कामी कार्यरत आहेत.

### केंद्र सरकारची ग्रिस्टॅक योजना

ग्रिकल्चर मिशन योजना राज्यात राबविण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत माहिती निर्मिती कक्ष, शेतकरी माहिती संच, हंगामी पिकांचा माहिती संच आणि भूसंदर्भाकीत भूभाग असणारे गाव नकाशे माहिती संच महसूल विभाग तयार करेल. यासाठी माहिती वापर कक्षाची स्थापना कृषि विभाग करेल. या साठी सुकाणू समिती, अंमलबजावणी समिती, क्षेत्रिय स्तरावर विभागस्तरीय, जिल्हास्तरीय समिती आणि तालुकास्तरीय समिती गठित करण्यात येतील. पिकांच्या माहिती संचासाठी तिन्ही हंगामात मिळून सुमारे ८१ कोटी ८३ लाख रुपये खर्च दरवर्षी येईल.हिंगोली जिल्ह्यातील वसमत येथील बाळासाहेब ठाकरे हळद (हरिद्रा) संशोधन व प्रशिक्षण केंद्रासाठी ७०९ कोटी २७ लाख रुपयांचा अतिरिक्त निधी मंजूर करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. याकेंद्रासाठी मंजूर अतिरीक्त निधी टप्पेनिहाय वितरीत करण्यात येणार आहे. हळदीवरील संशोधनासाठी तसेच निर्यातक्षम उत्पादन बनवण्यासाठी हे केंद्र स्थापन करण्यात आले आहे.राज्यातील चारही कृषि विद्यापीठांच्या प्रकल्पग्रस्तांमधून क आणि ड संवर्गातील पद भरतीसाठी विशेष बाब म्हणून निर्बंध शिथील करून मान्यता देण्याचा निर्णय सुद्धा आज झाला. ५० टक्के पदे ही त्याच विद्यापीठांच्या बाधित प्रकल्पग्रस्तांकरिता राखीव ठेवण्यात येतील. चारही कृषि विद्यापीठांत ३ हजार २३२ हेक्टर जमीन अधिग्रहीत करण्यात आली असून, यामुळे बाधित झालेल्या कुंटुंबातील पात्र उमेदवाची यात भरती करण्यात येईल. ही विशेष भरती प्रक्रीया राबविताना सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिकेचा निर्णय, समांतर आरक्षण व सामाजिक आरक्षण याची सांगड घालण्यात येईल, अशी माहिती कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे.

### केजला लागलेली कीड

येथे संघर्ष योद्धा मराठ्यांचे क्रांतीसुर्य मनोज दादा जरांगे पाटील यांच्या मराठा सेवकांना अरेरावीची भाषा करतात मुंदडा कुटुंबीय महापुरुषांचा अवमान व अनादर करण्याचे संयम यांनी ओलांडला आहे मुंदडा कुटुंबीयांना गर्व आहे ते आम्ही मारवाडी समाजाचे आहोत आमच्याकडे कोट्याधीश पैसे आहेत अमाप संपत्ती आहे त्यामुळे आम्ही कोणाचे काही जरी केले आमचे काहीच होत नाही आमची राज्यात सत्ता केंद्रात सत्ता मतदान तसेच मतदान विकत घेऊन निवडून येऊ या आवीरभावात मुंदडा कुटुंबीय चालत आहे यांची आता मस्ती उतरण्याची वेळ आलेली आहे येणाऱ्या विधानसभेत जनता जनार्दन जागा दाखवून देनार आहे असे नागरिकांतून भावना व्यक्त केल्या जात आहेत.

### दक्षिण कोरियाच्या हान कांग

महिला आणि दक्षिण कोरियातील पहिल्या महिला लेखिका ठरल्या आहेत. दक्षिण कोरियामध्ये नोबेल जिंकणाऱ्या त्या दुसऱ्या आहेत. दक्षिण कोरियाचे माजी अध्यक्ष किम दाइ जंग यांना सन २००० मध्ये शांततेचा पुरस्कार मिळाला होता. दक्षिण कोरियामध्ये लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले होते.कांग यांना त्यांच्या 'द व्हेजिटेरियन' या कादंबरीला आंतरराष्ट्रीय बुकर सन्मान २०१६ मध्ये जाहीर झाला होता. एका महिलेच्या मांसाहार खाणे थांबविण्याच्या निर्णयाचे विचित्र परिणाम उलगडून सांगणारी ही कादंबरी आहे.दक्षिण कोरियातील ग्वांग्जू शहरात १९७०मध्ये कांग यांचा जन्म झाला. लेखनाचे बाळकडू त्यांना घरातूनच मिळाले. त्यांचे वडील कादंबरीकार होते. त्यांनी सुरुवातीला कविता केल्या. नंतर कथेच्या माध्यमातून लिहायला सुरुवात केली. हान या १९९३ मध्ये कवयित्री म्हणून सर्वांसमोर आल्या. त्यांचा पहिला लघुकथासंग्रह १९९४मध्ये प्रसिद्ध झाला. १९९८ मध्ये त्यांनी 'ब्लॅक डिअर' ही पहिली कादंबरी लिहिली. 'द व्हेजिटेरियन', 'ग्रीक लेसन्स', 'ह्युमन ॲक्ट्स' आणि 'द व्हाइट बुक' यांचे त्यांनी इंग्रजीत भाषांतर केले आहे. 'वुई डू नॉट पार्ट' हे त्यांची आगामी कादंबरी आहे.

### उदार अंत:करणाच्या उद्योजकाला

स्मशानभूमीत नेण्यात आले. केंद्राच्या वतीने रतन टाटा यांच्या अंत्यसंस्काराला केंद्रीय गृहमंत्री अमित शहा उपस्थित होते. अमित शहा, केंद्रीय मंत्री पियुष गोयल आणि इतर मंत्री आणि अंबानींसारखे उच्च उद्योजकही उपस्थित होते.टाटा या नाममुद्रेच्या माध्यमातून भारतीय उद्योग जगताला आधुनिक युगात नेण्यासाठी झटणारे आणि या क्षेत्राचा ठसा आंतरराष्ट्रीय प्रतलावर उमटवणारे द्रष्टे उद्योगपती, दानवीर, टाटा उद्योसमुहाचे माजी अध्यक्ष रतन नवल टाटा यांचं बुधवारी रात्री मुंबईतील रुग्णालयात वृद्धापकाळाने निधन झाले. रतन टाटा गेले काही दिवस आजारी होते. आपल्या प्रकृतीस धोका नसल्याचं त्यांनी सोमवारीच समाजमाध्यमांवर जाहीर केले होते. परंतु, बुधवारी त्यांची प्रकृती खालावली आणि रात्री उशिरा त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाचं वृत्त समजातच समाजमाध्यमांवर अनेकांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह अनेकांनी त्यांच्याप्रती शोक व्यक्त केला.

## पान सहा वरून

### महाराष्ट्र सर्वांगीण विकासाची

आणि भावी वाटचालीस शुभेच्छा देऊन शरदचंद्र पवार साहेबांचा पुरोगामी विचार घेऊन पक्ष वाढीसाठी सर्वांनी मिळून कार्यरत राहावे याबद्दल मार्गदर्शन केले. यावेळी पक्षाचे शहराध्यक्ष ॲड.जीवनराव देशमुख, युवक तालुकाध्यक्ष तालुकाध्यक्ष शंकर शेजुळ, युवक शहराध्यक्ष सय्यद फिरोज, महिला आघाडीच्या अध्यक्षा वर्षा रायभोळे यांचेसह पक्षाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि इंदिरा नगर भागातील शेकडो नागरिकांची उपस्थिती होती.

### मुस्लिमांना उमेदवारी देऊन

समाजाने मोदी विरोधात व शरद चंद्र पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून एकजुटिने मतदान केले होते. त्यामध्ये माजलगाव मतदार संघातून हि बहुसंख्याक मुस्लिम समाजाच्या बुथवरिल टक्केवारी पाहिली तर ९० ते ९५ टक्के मतदान हे बजरंग बाप्पाला झाले आहे. त्यामुळे मुस्लिम समाजाने आपल्या समाजातील व्यक्तीला विधानसभेची उमेदवारी मिळावी ही आग्रही भूमिका समाजातील शिष्टमंडळाने पक्ष नेतृत्वाकडे केली आहे म्हणूनच माजलगाव मतदार संघातून मुस्लिम समाजापैकी शेख मंजूर यांनी समाजाच्या पाठिंब्यावर व नगराध्यक्ष पदाच्या कार्यकाळात केलेल्या विकास कामांवर पक्षाकडे आपल्या उमेदवारीची मागणी केली आहे. जिल्ह्यातील मुस्लिम समाजाच्या नजरा आता पक्षाच्या निर्णयाकडे लागलेल्या आहेत.

### गेवराईची जागा महाविकास

३९ हजाराचे प्रचंड मताधिक्य मिळाले होते. त्यामुळे या विधानसभा मतदारसंघातून पक्षाचा उमेदवार निश्चित निवडून येऊ शकतो. असा विश्वास तालुकाध्यक्ष अण्णासाहेब राठोड यांनी व्यक्त केला. तसेच पक्ष संकटामध्ये असताना आपण पक्षाच्या तालुकाध्यक्ष धुरा संभाळल्यानंतर गेवराई तालुक्यातील तळागाळात वाडी वस्ती तांड्यावरती पोहोचवला तसेच पक्षाचे भूत संघटना मजबूत करून तरुण शेतकरी महिला बेरोजगार सर्वसामान्य जनता यांना एकत्र करून पक्षाच्या प्रवाहामध्ये आणले त्यामुळे या मतदारसंघातून पक्षाचा उमेदवार निश्चित विजय होईल. बाहेर जाऊ कुठलाही उमेदवार आहेत न करता निष्ठावंत व सर्व सामान्यांना उमेदवारी द्यावी असे तालुकाध्यक्ष अण्णासाहेब राठोड यांनी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांना सांगितले. व त्यांनी महाविकास आघाडीचे जागावाटपाची चर्चा झाल्यानंतर निश्चित गेवराई विधानसभा मतदारसंघ राष्ट्रवादीकडे वळवण्यासाठी प्रयत्न केले जातील. महाविकास आघाडीतील सर्व नेत्यांना विश्वासात घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे ही जागा घेतली जाईल असे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आश्वासन दिले. तसेच सगळ्या गोष्टीचा विचार करून आपण चर्चा करून त्यातून निश्चित मार्ग काढू असे आश्वासित केले आहे.

### महाराष्ट्र परिवर्तनाचे

व्यासपीठावर उपस्थित होते. पुढे बोलताना विजय साळवे म्हणाले की, मनोज जरांगे दादांनी आरक्षण संदर्भात जे आंदोलन उभे केले आहे त्या आंदोलनात आम्ही सहभागी असून जे मनूवाद्याच्या हातात असेलेली राजकिय सत्तेचा माज चढलेल्यांना जमानीवर आणल्याशिवाय पर्याय नाही. तेव्हा कुठे तरी आपलं आरक्षण व संविधान टिकून राहिलं. महाराष्ट्रातील राजकारणात सध्या रडकीचा खेळ सुरू असून तु पडल्यासारखे कर मी मारल्यासारखे करतो अन् राजकीय सत्तेत तिसरा नको अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. ती हाणून पाडण्यासाठी मनोज जरांगे पाटील व डॉ राजरत्न आंबेडकर साहेब यांचे हात बळकट करून सर्व ताकतीने सर्व जाती धर्माच्या नागरिकांनी कामाला लागावे.

### विकासासाठी आम्ही

कोटी,तालखेड फाटा ते तालखेड रस्ता ५ की.मी. किमंत ५ कोटी,माजलगाव रोड ते जाभंळी तांडा,४.५०० कि.मी. किंमत २ कोटी७० लक्ष, मतदारसंघातील बीड तालुक्यातील पेडगाव फाटा ते कांबी, सौदाना रस्ता,९.७५० क.मी.किंमत ७ कोटी २७ लक्ष गेवराई तालुक्यातील भेड खु.ते.भेड बु.रस्ता ४ की.मी.किंमत ३ कोटी,केकत पागंरी ते हारीलाल नाईक तांडा, ३ कि.मी.२ कोटी रुपयाचे आज दि.१० ऑक्टोबर रोजी युवानेते शिवराज पवार यांच्या हास्ते शुभारंभ संपन्न झाला यावेळी अभियंता कुलकर्णी, तालुका प्रमुख शिनुभाऊ बेद्रे,शरद कचरे,वैभव मोरे,अभिजीत मोरे,संतोष जाधव, कृष्णा उडे,विठ्ठल मोरे,अभिजीत जाधव,संतोष गायकवाड, भरत गायकवाड, किशोर धोडलकर, समाधान मस्के,करण जाधव, गोरख मोटे,कृष्णा पाटोळे,बाबा वाघमारे,गणेश पवार, भाग्योदय पटेकर,दिपक शेलार,बाबु खराडे,रवि जगले,रंगनाथ कोळपे,मधुकर सौळुके,राजाभाऊ शिदे,किसान वाव्हळ, पप्पु पांचाळ,गुत्तेदार दागंट,मनोज फाटक,सुनिल कराडे,शुभम माऊली आदी उपस्थित होते,

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स ॲन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# परतीच्या पावसाचा बसला तडाखा!

## अस्मानी — नुकसानीसाठीही ७२ तासांचा अल्टीमेटम

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव सह तालुक्यात बुधवरी सायंकाळी झालेल्या परतीच्या मुसळधार पावसामुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीसाठी पोर्टल वर ७२ तासांत नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तक्रारी करता येणार आहे त्यामुळे पुढील दोन दिवस संधी असल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी मदन सिसोदिया यांनी दिली

सोयगाव सह तालुक्यातील सावळदबारा,फरदापुर, जरंडी, बनोटी या भागात परतीच्या पावसाने धुमाकूळ घातला सावळदबारा मंडळात सलग दोन तास झालेल्या संततधार पावसाने पिकांचे नुकसान झाले असून वरखेडी बू व पळसखेडा शिवारात वादळी वाऱ्याने केळी आडवी झाली आहे दरम्यान परतीच्या



पावसाने स्थानिक आपत्ती म्हणून नुकसान भरपाईचा निकष आहे त्यामुळे काढणी पश्चात नुकसान झालेल्या पिकांना च ही भरपाई मिळणार असून कापणीपश्चात पिकांना नुकसानी साठी ग्राह्य धरण्यात येणार नसल्याने मका व सोयाबीन पिकांच्या नुकसानी साठी परतीच्या पावसाचा निकष नाही त्यामुळे नुकसानीच्या तक्रारी साठी केवळ मका,सोयाबीन वगळून कपाशीच्या भिजून नुकसान झालेल्या पिकांनच नुकसान भरपाई मिळणार असल्याचे कृषी व महसूल विभागाने स्पष्ट केले आहे.

### कंपनीने फेटाळल्या ८ हजार ८८४ तक्रारी

या आधी सोयगाव तालुक्यात दोन वेळा झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसानी च्या नऊ हजार ५६७ शेतकऱ्यांनी नुकसानी च्या ७२ तासात पोर्टलवर तक्रारी केल्या होत्या त्यापैकी ८ हजार ८८४ शेतकऱ्यांच्या तक्रारी पिकविम्या च्या कंपनी ने फेटाळून लावल्या आहे त्यामुळे दोनवेळा झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसानी साठी केवळ ६८३ शेतकऱ्यांना पडताळणी साठी पात्र ठरविण्यात आले आहे बुधवरी झालेल्या परतीच्या पावसाच्या नुकसानी च्या तक्रारी गुरुवारी रात्री पासून स्वीकार न्यात येणार आहे त्यामुळे शेतकऱ्यांनी ७२ तासांत तक्रारी करण्यासाठी पुन्हा संधी मिळाली आहे.

# कुस्तीपटूंची दमदार कामगिरी

## स्पर्धा:दोन सुवर्ण तर एक रौप्य पदकाची कमाई

पैठण/पुण्यभूमी प्रतिनिधी

विश्वात्मा शिक्षण प्रसारक मंडळ छत्रपती संभाजीनगर संचलित कौशल्या विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय पाटेगाव शाळेतील विद्यार्थ्यांनी आज दि. १०ऑक्टोबर २०२४ गुरुवार रोजी विभागीय क्रीडा संकुल छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले.

त्यामध्ये वजनगट ५५ किलो सुवर्णपदक प्रथम क्रमांक – तांबे नंदा नरहरी वजनगट – ७२किलो सुवर्णपदक प्रथम क्रमांक– भवर तृप्ती नारायण १९ वर्षाखालील गटात मुले वजनगट– ५७ किलोरोप्यपदक द्वितीय क्रमांक– रकटे कृष्णा बंडू या यशाबद्दल विजयी झालेल्या पहिलवानांचे संस्थेचे अध्यक्ष श्री चंद्रकांतजी गायकवाड साहेब,सचिव श्री वाल्मिकरावजी सुरासे साहेब,



उपाध्यक्ष विठ्ठलजी पैठणकर सर, कोषाध्यक्ष विशाल सुरासे जिल्हा क्रीडा अधिकारी बाजीराव देसाई साहेब, लता लोंढे मॅडम,तालुका क्रीडा अधिकारी गीता साखरे मॅडम, तालुका क्रीडा मार्गदर्शक डॉ सोमनाथ टाक, लक्ष्मण सपकाळ, पै.बंडू रकटे, पै. नारायण भवर पै. नरहरी तांबे,महाविद्यालयाचे प्राचार्य श्री निलेशजी गायकवाड,स्वप्नील गव्हाणे,बालाजी नलभे,नंदकिशोर पातकळ,स्वप्नजा पाटील,विजय सपकाळ,सोन्याबापू पालवे,नारायण औटे,भाऊसाहेब गायकवाड,अमोल गायकवाड,प्रकाश कामडी,अनिता तारख,आकेश दांडेकर,प्रविण काळे,शितल धायगुडे,अस्मिता भिसे,अक्षय शेळके,निखील पापुलवार,विठ्ठल त्रिभुवन,सतिष पवार,महेश गायकवाड इत्यादिनी त्यांना शुभेच्छा देऊन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# व्हिडिओ निर्मिती स्पर्धेत प्रथम क्रमांक

सोयगाव /पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे मार्फत आयोजितशिक्षकांसाठी दर्जेदार व्हिडियो निर्मिती स्पर्धा घेण्यात आली होती. त्या स्पर्धेचा तालुका व जिल्हास्तर निकाल लागला असुन त्यामध्ये जिल्हा परिषद शाळा बोरमाळ तांडा येथील शिक्षक यशवंत गोकुळ पाटील यांचा इ. १ ते २ या गटात भाषा विषयासाठी व इ. ३ ते ५ गटात भाषा विषयासाठी दोन्ही गटातून सोयगाव तालुक्यात प्रथम क्रमांक मिळाला आहे...



या यशाबद्दल बोरमाळ तांडा येथील जिल्हा परिषद शाळेचे सह शिक्षक यशवंत गोकुळ पाटील यांचा सत्कार करण्यात आला, यावेळी सरपंच सदाशिव राठोड, शालेय समितीचे अध्यक्ष अंकुश चव्हाण, राहुल चव्हाण,रामेश्वर राठोड, युवराज चव्हाण, अशोक कोलते, दिनेश राठोड शाळेचे मुख्याध्यापक राकेश चौधरी व सर्व शिक्षक वृंद आदी उपस्थित होते.

# शेतकऱ्यांचे प्रश्न तातडीने मार्गी लावावेत

## पृथ्वीराज साठे : निवेदनातून आंदोलनाचा इशारा

अंबाजोगाई/पुण्यभूमी प्रतिनिधी

शेतकऱ्यांना सन २०२२ व सन २०२३ चा पीक विमा तात्काळ द्या तसेच सोयाबीनला १० हजार रूपये व कापसाला १५ हजार रूपये हमी भाव द्यावा अशी मागणी केज विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार पृथ्वीराज साठे व तालुकाध्यक्ष अमर देशमुख यांनी केली. राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून उपजिल्हाधिकारी यांना बुधवार, दिनांक १० ऑक्टोबर २०२४ रोजी निवेदन देण्यात आले.

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे केज विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार पृथ्वीराज साठे व तालुकाध्यक्ष अमर देशमुख यांनी दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकरी खुप मोठ्या संकटात सापडलेला आहे. गेल्या २–३ वर्षांपासून शेतकऱ्याच्या हातातोंडाला आलेले पिक गेल्यामुळे शेतकरी खुप



मोठ्या आर्थिक संकटात सापडलेला आहे. अशा परिस्थितीत सन २०२२ व सन २०२३ चा पिक विमा अद्यापही शेतकऱ्यांना मिळालेला नाही. ३१ ऑगस्ट पूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात पिक विमा जमा होईल असे आश्वासन महाराष्ट्र शासनाने दिले होते. परंतु, ३० सप्टेंबर सुद्धा संपून गेला तरी अद्यापही पिक विमा मिळालेला नाही. तसेच सोयाबीन व कापूस या पिकांना हमी भाव नसल्यामुळे काबाडकष्ट करून पिकवलेल्या पिकांबद्दल शेतकऱ्यांच्या हाती काहीच लागत नाही. तरी सन २०२२ व सन २०२३ चा पिक विमा शेतकऱ्यांच्या खात्यात तात्काळ जमा करण्यात यावा तसेच सोयाबीनला १० हजार रूपये व कापूस या पिकाला १५ हजार रूपये हमी भाव देण्यात यावा, अन्यथा राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. सदरील निवेदन देताना माजी आमदार पृथ्वीराज साठे, तारेख अली उस्मानी, तानबा लांडगे, ॲड. शहाजहान खान पठाण, गोविंद टेकाळे, अंकुश ढोबळे, हमीद चौधरी, राहुल सिरसट, शेख मुनव्वर, आश्रुबा करडे, हाजी अब्दुल खालेक कुरेशी, रविंद्र मोरे, चंद्रकला देशमुख, खतीब ताई, शेख बुऱ्हानोद्दीन, यश अलझेंडे, दिनेश साठे, सुधाकर जोगदंड, रामराव आडे, जुम्मा चौधरी, राजाभाऊ शिंदे, निखिल रणदिवे, जय गवळे, शेख इम्रान, सुरज भालेराव, शंकर साठे, आदित्य कांबळे, इम्रान पठाण, शेख समद शेख महम्मद, रमेश कदम, रमजान गवळी, सय्यद भाई आदींसह इतरांची उपस्थिती होती.

# सोयगाव परिसरात वादळी वाऱ्याचा तडाखा

## अस्मानी: शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव सह परिसरात गुरुवारी रात्री नऊ वाजता सुरू झालेल्या वादळाने सोयगाव, जरंडी, निंबायती बहुलखेडा या चार गावात घरावरील पत्रे उडाली तर कपाशी पिकं वादळाने आडवी झाली आहे अर्ध्या तासापासून सोयगाव परिसराला वादळाने तडाखा दिला त्यातच सोयगाव सह अकरा गावात दहा ते पंधरा मिनिटे जोरदार पाऊस झाला आहे रात्री साडे नऊ पर्यंत वादळाचा तडाखा व पावसाचा तडाखा सुरु होता दरम्यान सोयगाव, जरंडी, माळेगाव,पिंपरी,निंबायत ी,कवली,रामपुरा तांडा बहुलखेडा कंकराळा,उमर विहिरे, निमखेडी, घोसला, नांदगाव, नांदगाव तांडा या गावात जोरदार पाऊस झाला आहे दरम्यान वादळी वारा आणि पावसाच्या तडाख्यने या परिसराचा वीज पुरवठा खंडित झाला त्यामुळे रात्री उशिरापर्यंत ही गावे अंधारात होती पावसाचा जोर आणखीच वाढतच होता.

### अंधारामुळे नुकसानी चा अंदाज येईना

सोयगाव सह परिसरात पंधरा गावात रात्री उशिरापर्यंत वीज पूरवठा खंडित झाल्या मुळे अंधारात पिकांची नुकसानीचा अंदाज आला नव्हता एकीकडे आपत्ती ग्रस्त स्थिती असताना सोयगाव तहसील कार्यालयात आपत्ती निवारण कक्ष कुलूप बंद होता ग्रामीण भागातही आपत्ती निवारण उपाय योजना सतर्क नव्हत्या तलाठी गैरहजर होते.

# महायुती सरकारच्या काळात मुली असुरक्षीत!

## खा. रजनीताई पाटील:लाडकी बहीण फक्त नावालाच

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

लापुरची घटना अद्याप विसरली नाही तो वर बीड जिल्ह्यातील माजलगाव येथील एका साडे पाच वर्षाच्या चिमुरडीवर झालेला अत्याचार हा अतिशय किळसवाणा व निच पणाचा कहर आहे. शिक्षण, शिक्षक व शैक्षणिक परिसर हे पवित्र मानले जातात मात्र सद्या हे उलट होताना दिसत आहे. एकीकडे सरकार लाडकी बहीण योजना देऊन महिलांना खुश करण्याचा प्रयत्न करत असले तरी प्रत्यक्षात राज्यातील बहिणीवर किती अत्याचार होत आहेत मागच्या काही महिन्यांपासून अत्याचाराच्या किती घटना घडत आहेत हे देखील सरकारमध्ये असलेल्या सत्ताधाऱ्यांनी चिंतन करावे. महाराष्ट्रात दररोज अशा अनेक



घटना समोर येत असताना राज्य सरकार मात्र याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करत आहे. महायुतीच्या सरकारने महिलांच्या सुरक्षेकडे लक्ष देणे अपेक्षित आहे मात्र केवळ निवडणुका डोळ्यासमोर ठेवून हे सरकार फक्त आणि फक्त राजकारण करत आहे मात्र अतिशय लहान, अल्पवयीन मुली, स्त्रिया सद्या असुरक्षित आहेत. २५ ते २८ सप्टेंबर च्या दरम्यान ही अमानुष घटना घडली असून याचा एक महिला म्हणून तसेच कॉंग्रेस पक्षाचा वतीने जाहीर निषेध करते व या मद्ये असणाऱ्या आरोपीला कडक शासन व्हावे व जेणे करून अस काही करणाऱ्या नराधमाना कायद्याचा धाक राहिला पाहिजे. ही राज्य सरकारकडून अपेक्षा आहे.

# राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत महाराष्ट्र विद्यालयाचे यश

परळी ी/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे माजी खासदार, झुंजार स्वातंत्र्य सेनानी कॉ. गंगाधरअप्पा बुरांडे यांच्या स्मृती दिनानिमित्त आयोजित राज्य स्तरीय वक्तृत्व स्पर्धेत परळी तालुक्यातील महाराष्ट्र विद्यालयात शिक्षण घेत असलेल्या तेजस्विनी सलगरे या विद्यार्थिनीने दमदार वक्तृत्व करत प्रथम पारितोषिकावर आपले नाव कोरले.

कॉ.गंगाधरअप्पा बुरांडे यांच्या स्मृतीदिनानिमित्त प्रतिवर्षाप्रमाणे या ही वर्षी राज्य स्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन स्मृती प्रतिष्ठान मार्फत करण्यात आले होते. अंबाजोगाई येथे संपन्न झालेल्या या राज्यस्तरीय स्पर्धेत राज्यभरातून ३५० पेक्षा अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. या वक्तृत्व स्पर्धेकरिता स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय अंबाजोगाई येथील अधिष्ठाता डॉ.शंकर धपाटे, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्रा.योगेश सुरवसे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.या वक्तृत्व स्पर्धेत तालुक्यातील महाराष्ट्र विद्यालय मोहा येथील इयत्ता ८ वि वर्गात शिक्षण घेत असलेली कु.तेजस्विनी नीलकंठ सलगरे हिने माध्यमिक गट ( ८ वि ते १०) मध्ये सहभाग नोंदवत दमदार वक्तृत्व सादर करत प्रेक्षकांसह परीक्षण करणाऱ्याला आपल्या वक्तृत्वाने मोहित करत प्रथम पारितोषिक पटकावले.कु.तेजस्विनी सलगरे हिच्या या यशाबद्दल तिचा आणि तिच्या पालकांचा शाळेच्या वतीने शाल–पुष्पगुच्छ देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.या सन्मान सोहळ्याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक मुरलीधर बोराडे, उपमुख्याध्यापक सुरेंद्र हरदास, जेष्ठ शिक्षक शेख सर आदींसह तेजस्विनी सलगरे हिचे पालक व्यासपिठावर उपस्थित होते.

# उद्योजक होण्याचे स्वप्न पहावे

## समारंभ:तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांचे मत

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

विद्यार्थ्यांनी शिक्षण पूर्ण केल्यानंतर नोकरीवर अवलंबून न राहता कारखानदार होण्याचे स्वप्न ही पाहिले पाहिजे असे प्रतिपादन परळीचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांनी केले ते परळी येथील ग्रामीण औ. प्र. संस्था संगम (परळी) येथे विजया दशमीच्या निमित्ताने शस्त्र पूजन कार्यक्रमात केले.

सविस्तर माहिती अशी की, परळी चे तहसीलदार व्यंकट मुंडे हे अध्यक्षस्थानी होते तर प्रमुख पाहुणे म्हणून परळी औ. वि. केंद्राचे आधीक्षक अभियंता डी डी कोकाटे, कार्यकारी अभियंता एस व्ही माने, नायब तहसीलदार बाबुराव रुपनर ,टोकवाडीच्या सरपंच गोदावरीताई मुंडे ,ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक रानबा गायकवाड ,पत्रकार इंजि भगवान साकसमुद्रे, परळीचे तलाठी तथा मंडळ अधिकारी विष्णू गित्ते,विलास ताटे (–ऋच्ॅ ), ॲड. केशव आघाव ,ॲड. एस. एम. मुंडे यांची उपस्थिती आणि प्रशिक्षणार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन




लाभले.जे काही आपण क्षेत्र निवडले त्या क्षेत्रात आपण टॉप केलं पाहिजे प्रत्येक विद्यार्थ्यांनी सकारात्मक राहुल ध्येय गाठले पाहिजे असे यावेळी साहित्यिक रानबा गायकवाड यांनी केले.यावेळी मान्यवरांच्या हस्ते औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विविध उपकरणांची पूजा करण्यात आली याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले कार्यक्रमात ग्रामीण अधिक प्रशिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट सूत्रसंचालन केले कार्यक्रमाच्या अध्यक्ष समारोपनंतर संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय पवार , संस्थेचे प्राचार्य एस एस घुगे, सर्व स्टाफ वर्ग आणि उपस्थित सर्व प्रशिक्षणार्थी यांच्या वतीने सर्व मान्यवरांचे आभार व्यक्त करण्यात आले.

## योजना — धनंजय मुंडेंची स्वप्नपूर्ती, शासन निर्णय निर्गमित

# सानुग्रह अनुदान योजनेचे कवच लागू

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

सामाजिक न्याय खात्याचे मंत्री असताना धनंजय मुंडे यांनी लावलेल्या रोपट्याला आता फळे येताना दिसत असून नुकत्याच राज्य शासनाने ऊसतोड कामगारांसाठी घोषित केलेल्या अपघात विमा कवचाला सानुग्रह अनुदान योजनेचे मूर्त स्वरूपात प्राप्त झाले असून याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या माध्यमातून या सानुग्रह अनुदान योजनेची अंमलबजावणी करण्यात येणार असून ऊस तोडणीच्या हंगामात कोणत्याही प्रकारच्या अपघातामध्ये ऊसतोड कामगारांचा मृत्यू झाल्यास त्याला पाच लाखांचे कवच या योजनेतून देण्यात येणार आहे, तर कायमचे अपंगत्व आल्यास अडीच लाख रुपयांची मदत दिली जाणार आहे. ऊसतोड कामगारांच्या झोपडी व साहित्याला १० हजारांचे, वैयक्तिक अपघातात उपचारासाठी ५० हजार रुपयांचे, लहान बैलजोडी मृत झाल्यास ७५ हजार रुपयांचे तर मोठी बैलजोडी मृत झाल्यास १ लाख रुपयांचे कवच या सानुग्रह अनुदान योजनेतून लागू करण्यात आले आहे. अत्यंत कमीत कमी कागदपत्रे तसेच जिल्हा स्तरावर मंजुरीचे अधिकार दिल्याने खऱ्या अर्थाने ऊसतोड कामगारांना



या योजनेचा अधिक लाभ मिळणार आहे. आजवर ऊसतोड कामगारांची कुठे कागदावर नोंद सुद्धा नसायची, मात्र सध्याचे कृषिमंत्री व तत्कालीन सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे यांच्या पुढाकारातून स्व.गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाला मूर्त स्वरूप मिळाले. त्याला कायमस्वरूपी निधी मिळण्याचा मार्ग सुकर झाला. महामंडळाच्या माध्यमातुन धनंजय मुंडे यांनी सुरू केलेल्या संत भगवानबाबा शासकीय वस्तीगृह योजनेतून तब्बल ८२ वसतिगृहे सुरू करण्यात आली. ऊसतोड कामगारांची नोंदणी झाली. त्यापाठोपाठ आता अत्यंत जोखमीचे काम करणाऱ्या ऊसतोड कामगार, वाहतूकदार, मुकादम तसेच कामगारांची बैलजोडी ते अगदी झोपडी व त्यातील साहित्याला अपघात व नैसर्गिक आपत्ती अपघाता मुळे होणाऱ्या नुकसानीसाठी सानुग्रह अनुदान योजना लागू केल्याने, धनंजय मुंडे यांनी ऊसतोड कामगारांच्या कल्याणासाठी पाहिलेले आणखी स्वप्न पूर्ण झाले आहे, असे म्हणता येईल. राज्यातील ऊसतोड कामगार, वाहतूकदार, मुकादम, बैलजोडी, झोपडी आदींना सानुग्रह अनुदान योजना लागू केल्याबद्दल धनंजय मुंडे यांनी राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत.

# टायगर अभी जिंदा है!

## सुजय विखे पाटील :पुन्हा त्याच ताकदीनेकार्यरत

नगर/पुण्यभूमी प्रतिनिधी

नगर तालुक्यातील पिंपळगाव उज्जैन येथील कार्यक्रमात सुजय विखे पाटील यांनी विरोधकांवर जोरदार टीकास्त्र सोडले मी कुठेही गेलेलो नाही मी कुठेही लपलेलो नाही टायगर अभी जिंदा है त्यामुळे तुम्ही काळजी करायचं काहीही कारण नाही असे वादळ येत असतात आणि जात असतातस्व बाळासाहेब विखे पाटील यांनीही पराभव स्वीकारला होता मी तर त्यांच्या दहा टक्केही नव्हतो परिस्थिती बदलली माझा पराभव झाला पण परिस्थिती बदलत असते आपण पुन्हा एकदा त्याच ताकतीने व उमेदीने सर्वसामान्य लोकांचे कामे करतच राहणार आहोत

आज मी या ठिकाणी आलो आहे पण या ठिकाणी जमलेल्या माणसातील अर्ध्या लोकांनी माझा कार्यक्रम केला मात्र मी तुम्हाला सांगतो माझा कार्यक्रम झाला नाही



तर तुम्ही तुमच्या पुढच्या पिढीचा कार्यक्रम केला अशी खंतही त्यांनी व्यक्त केलीतुम्ही माझे भाषण कधीही ऐका आणि निवडून आलेल्या खासदाराचे भाषण ऐका तुम्हाला लगेच फरक जाणवेल की निवडून आलेले खासदार भाषणात कधी जनसामान्याच्या जीवनात परिवर्तन व्हावे असं कधीच बोलत नाही फक्त विरोधकावर टीका टिपणी करत असतात त्यामुळे तुम्ही काळजी करायचं काही कारण नाही टायगर अभी जिंदा है अशा शब्दांत खा निलेश लंके यांच्यावर टीकास्त्र सोडले.




## रतन टाटांनी २६/११ हल्ल्यानंतर पुन्हा उभारले 'ताज' हॉटेल

मुंबईत २६ नोव्हेंबर२००८ रोजी पाकिस्तानी दहशतवाद्यांनी हल्ला केला. समुद्री मार्गे दहशतवादी आले होते. त्यावेळी झालेला हल्लाचा थरारक आठवणी आजही ताज्या आहेत. त्या अंगावर शहारे आणणाऱ्या आहेत. दहशतवाद्यांनी प्रसिद्ध ताज हॉटेलला लक्ष्य केले होते. या हल्ल्याची ती काळरात्र कशी होती हे रतन टाटा यांनी एका मुलाखतीत सांगितले होते.

हल्ल्यामुळे उद्धवस्त झालेले 'ताज' पाहून ते जराही मागे हटले नाहीत. त्यांनी सर्वांना या कटू आठवणी विसरून जाण्याची उमेद दिली आणि मुंबईत गेट वे ऑफ इंडियाच्या समोर ताज हॉटेल पुन्हा दिमाखात झळकले ते आजही. काहीही झालं तरी संकटावर मात करून पुन्हा उभं राहता येतं हे रतन टाटांनी आपल्या कृतीतून जगाला दाखवून दिले आहे. मुंबईवरच्या दहशतवादी हल्ल्याला रतन टाटांनी दिलेलं हे खणखणीत उत्तर होतं. आज त्यांचं जाणे सर्वांनाच चटका लावणारं आहे.



ख्यातनाम उद्योजक, देशवासीयांच्या गळ्यातील ताईत बनलेले उद्योगपती आणि टाटा उद्योग समूहाचे अध्वर्यू रतन नवल टाटा यांचे बुधवारी रात्री उशिरा दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या जाण्याने उद्योग जगतातील लखलखता ध्रुवतारा निखळला आहे. त्यांच्या निधनामुळे देशभरात शोककळा पसरली असून, जगभरातून शोक व्यक्त होत आहे.

# पितृतुल्य व्यक्तिमत्त्व

भारतात उद्योगांचे साम्राज्य उभं करणारे, भारतीय उद्योगाला जागतिक ब्रॅंड मिळवून देणारे प्रसिद्ध उद्योगपती रतन टाटा आता आपल्यात नाहीत. त्यांच्या जाण्याने केवळ उद्योगजगताचंच नव्हे तर भारताच्या सामाजिक क्षेत्राचंही मोठं नुकसान झालं आहे. भारताने एक दिलदार स्टेट्समन गमावला आहे. रतन टाटा हे भारतीय उद्योग जगतातील पितृतुल्य व्यक्तिमत्व होते. आज अनेक तरुण, नवउद्योजकांचे ते हिरो आहेत. त्यांच्या आदर्श विचारावर चालण्याचा अनेक जण प्रयत्न करत आहेत. रतन टाटा स्वत:ला एक उद्योजकच मानत होते. त्यांची साधी राहणी आणि समाजासाठी काही करण्याचा प्रयत्न अनेकांसाठी प्रेरणादायी आहे.

## टाटा सन्सची यशस्वी वाटचाल

रतन टाटा यांनी मार्च १९९१मध्ये टाटा सन्सचे अध्यक्षपद स्वीकारले आणि २८ डिसेंबर २०१२ रोजी निवृत्त झाले. त्यांच्या कार्यकाळात टाटा समूहाचा महसूल अनेक पटींनी वाढला. हा महसूल १९९१मध्ये फक्त १०,हजार कोटी रुपयांच्या उलाढालीवरून २०११-१२मध्ये युएस$ १००.०९ अब्ज इतका वाढला.

२००० मध्ये टाटा टी कडून युएस$४५० दशलक्ष मध्ये टेटली, २००७ मध्ये ६.२ बिलियन मध्ये टाटा स्टीलकडून पोलाद निर्माता कोरस आणि २००८ मध्ये २.३ बिलियनमध्ये टाटा मोटर्स यासह काही महत्त्वपूर्ण संपादनांद्वारे त्यांनी समूहाचे नेतृत्व केले. ऐतिहासिक जग्वार लॅंडचा कंपनीत समावेश आहे. निवृत्तीनंतर टाटा यांना त्यांचे उत्तराधिकारी सायरस मिस्त्री यांच्याशी बोर्डरूम युद्धाचा सामना करावा लागला. मिस्त्री यांना २४ऑक्टोबर २०१६ रोजी टाटा सन्सच्या अध्यक्षपदावरून काढून टाकण्यात आले. मिस्त्री यांना हटवल्यानंतर ते समूहाचे अंतरिम अध्यक्ष म्हणून परत आले. त्यानंतर जानेवारी २०१७ मध्ये टाटा समूहाचे नेतृत्व एन. चंद्रशेखरन यांना देत. रतन टाटा यांनी टाटा सन्सच्या मानद अध्यक्षपदाची भूमिका स्वीकारली.

## एकटे आणि प्रसिद्धीपासून दूर राहणारे रतन टाटा

जेआरडी टाटांप्रमाणेच रतन टाटा देखील काटेकोर शिस्तीसाठी ओळखले जात. ते बरोबर साडे सहा वाजता कार्यालयातून बाहेर पडत. जर कार्यालयातील कामासाठी त्यांना कोणी घरी संपर्क केला तर ते अनेकदा चिडायचे. घरी ते एकांतात फाईल आणि इतर कागदपत्रांचा अभ्यास करायचे,वाचन करायचे. जर ते मुंबईत असले तर वीकेंड त्यांच्या अलीबाग येथील फार्म हाऊसवर घालवायचे. त्यावेळेस त्यांच्यासोबत त्यांच्या कुत्र्यांव्यतिरिक्त इतर कोणीही नसायचं. त्यांना फिरण्याची आवड नव्हती आणि ना त्यांना भाषण द्यायला आवडत होतं. बडेजाव दाखवणं किंवा दिखाऊपणाचा त्यांना राग यायचा. लहानपणी जेव्हा त्यांना शाळेत रोल्स रॉईसमधून सोडलं जात असे तेव्हा ते अवघडून जायचे. रतन टाटा यांना जवळून ओळखणाऱ्याचं म्हणणं आहे की जिद्द हे रतन टाटा यांच्या कुटुंबाचं स्वभाव वैशिष्ट्यं होतं. जेआरडी टाटा आणि त्यांचे वडील नेवल टाटा यांच्याकडून रतन टाटांकडे हा गुण आला होता.

## रतनजी

रतनजी, तुम्हीच सांगा
तुम्हाला 'टाटा' कसा करू?
गीतेमधली व्यवसायात्मिका बुद्धी
राष्ट्रासाठी योजलीत
व्यक्ती ते समष्टी
सर्वांचं भलं करण्यासाठी
सारी जीवनवर्षे मोजलीत
तुम्ही चिरंजीव न होता
गेलात
डोळ्यांतील आसवांना
सांगा कसा आवरू
रतनजी,
रतनजी, तम्हीच सांगा
तुम्हाला 'टाटा' कसा करू?

यंत्र तंत्रादी विज्ञानम्
मध्ये
तळातला माणूस पाहीलात
सर्वोच्च पदावर राहूनही
कायम नम्र राहिलात
अतिरेक्यांनी हल्ला
केलेल्या ताजला
पुन्हा ताज मिळवून दिलात
राष्ट्राच्या प्रत्येक संकटात
दिलात संपन्नतेचा हात
वाटतं
तुमच्यासारखी माणसं कधीच
नयेत मरू
रतनजी
रतनजी, तुम्हीच सांगा
तुम्हाला 'टाटा' कसा करू?
अल्पसंख्याक आपला समाज
पण सत्तेकडून काही मागितलं
नाहीत
उलट तुम्हीच देशाचा सत्तेविना
आधार झालात
हे सर्व जगाला आहे माहीत
तुमच्या निधनानंतर भारतीय ध्वज
अर्ध्यावर उतरेल का? ठाऊक नाही
कारण राजकारणाला विधीनिषेध
नुरला काही
रतनजी, तुम्हीच सांगा
तुम्हाला 'टाटा' कसा करू?

– डॉ. संजय उपाध्ये



## 'आम्ही उद्योगपती, व्यापारी नाही', रतन टाटा यांनी धनदांडग्यांना शिकवला धडा

व्यापारी हा नेहमी पैशांच्या मागे धावतो, त्याला नफा कमवायचा असतो. तर उद्योजकाला नफ्यापेक्षा लोकांच्या भल्याचा विचार असतो. हे सांगण्याचे कारण म्हणजे, काही वर्षांपूर्वी एका कार्यक्रमात रतन टाटा यांनी व्यापारी आणि उद्योजकामधील अंतर समजावून सांगितले होते. 'आम्ही उद्योगपती, व्यापारी नाही, त्यामुळे नफा हा आमच्यासाठी फार महत्त्वाचा नाही. आमच्यासाठी देश आणि समाजाचं कल्याण महत्त्वाचं आहे', असे विचार त्यांनी या कार्यक्रमात व्यक्त केले. त्यावेळी टाळ्यांचा कडकडाट थांबला नाही. आज रतन टाटा आपल्यात नाहीत, पण त्यांच्या विचारांचा मोठा वारसा ते आपल्याकडे ठेवून गेले आहेत. त्यांनी असे धडे शिकवले की त्यातून एक चांगला समाज घडू शकतो.

उद्योगपती आणि व्यापारी यांच्यामधील अंतर काय हे रतन टाटा यांनी समजावून सांगितले. ते केवळ उदाहरण देऊन थांबले नाहीत. तर १९८१ मध्ये टाटा इंडस्ट्रीजच्या अध्यक्षपदी असताना एक खास धोरण राबवले. त्यांनी मोठ्या उद्योगात अनेक बदल केले. त्याचा पुढे देशाला फायदा झाला. उद्योगात जोखीम घ्यायला ते कधी कचरले नाहीत. त्यांनी नव उद्योजकांना जोखीम घेण्यास सांगितले. रतन टॉंटा यांनी अनेक जागतिक कंपन्यांचे अधिग्रहण करताना हीच दूरदृष्टी उपयोगात आणली.

## रतन टाटांमुळे टाटा उद्योगाला नवी उभारी



रतन टाटा ज्यांचं नाव घेतल्याशिवाय भारताचं उद्योग वर्तुळ पूर्ण होऊ शकत नाही. नसरवानजी टाटा यांनी उभारलेल्या, जमशेदजी टाटा यांनी वाढवलेल्या टाटा उद्योग समुहाना विस्तारण्यात रतन टाटा यांचा मोठा वाटा राहिला आहे. आज एकही अशी वस्तू नाही जी टाटा ग्रुप तयार करत नाही. पिढ्यान् पिढ्याच्या व्यवसायाला रतन टाटा यांनी नवी उभारी दिली ती जे. आर. डी. यांच्या विचाराने आणि आधुनिकतेच्या वाटेने रतन टाटा जेव्हा टाटा उद्योग समुहात आले तेव्हा त्यांच्या एका विचाराने मरगळलेल्या व्यवसायाला त्यांनी नवी उभारी दिली.

१९७१ टाटा ग्रुपमध्ये ॲक्टिव्ह होताच रतन टाटा यांनी मोठा निर्णय घेतला. रेडिओ बनवणं थांबवूयात. कारण जर 'नेल्को'ला नव्याने उभं करायचं असेल तर आपल्याला नवा विचार आणावा लागेल. आपण सॅटलाईट कम्युनिकेशनवर काम सुरु करूयात, असे रतन टाटांनी सुचवलं. तसे काम सुरु झालं आणि १९७५ ला पुन्हा एकदा 'नेल्को' चा मार्केट शेअर २० टक्क्यांवर आला. 'नेल्को' ला रतन टाटांनी पुन्हा पूर्वपदावर आणले. पण पुढे आणीबाणी लागली अन् हा 'नेल्को'चा व्यवसाय बंद झाला. पण या सह अन्य उद्योगांमध्ये रतन टाटा यांचं योगदान मोठे आहे. जे 'नेल्को' डबघाईला आले होते. तिथे रतन टाटा यांनी एन्ट्री केली आहे. स्वत: चा ठसा उमटवत त्यांनी या उद्योगाला नवी उभारी दिली. रतन टाटा यांनी जे. आर. डी. टाटा यांनी उभारलेला व्यवसाय रतन टाटांनी आणखी पुढे नेला.




## सर्वसामान्यांच्या चारचाकीचे स्वप्न केले साकार

प्रत्येक भारतीयाकडे स्वत:ची कार असावी असे स्वप्न रतन टाटा यांनी उराशी बाळगले होते. त्यांनी त्यातूनच २००८ मध्ये नॅनो कारचे स्वप्न पूर्ण केले. त्या प्रकल्पात नफातोट्याचे गणित त्यांनी पाहिलेच नाही. त्यांचे एकच स्वप्न होते की सर्वसामान्यांसाठी एक किफायतशीर कार असावी. ते स्वप्न त्यांनी प्रत्यक्षात उतरवले. त्यांनी उद्योगातील ६० टक्के भाग टाटा ट्रस्टला देण्याचे धोरण स्वीकारले होते.



## संन्यस्त उद्योगपती

वसंत कानेटकर यांच्या बेईमान नाटकात मी धनराज या उद्योगपतीची भूमिका साकारली होती. यातील स्वामी नावाच्या पात्राच्या तोंडी एक संवाद आहे "खरा उद्योगपती वृत्तीने संन्यस्त असला पाहिजे!" हा संवाद आठवण्याचे कारण स्व.रतन टाटा यांच्यासाठी हा संवाद आणि त्यातील गर्भित अर्थ तंतोतंत लागू होतो. एका पत्रकार परिषदेत एका पत्रकाराने रतनजींना विचारले "तुम्ही नवकोट नारायण झालात तरी नवे नवे उद्योग सुरुच ठेवता. तुम्हाला कोठेतरी थांबावेसे वाटत नाही कां?"

यावर रतनजी उत्तरले आम्ही थांबलो तर लाखो लोकांचा रोजगार थांबेल.आज माझ्या उद्योग समुहात लाखो कर्मचारी आहेत. म्हणजेच लाखो प्रपंच त्यावर अवलंबून आहेत. रोजगारासाठी देशाच्या अर्थकारणासाठी उद्योग असतात. ते थांबले तर रोजगार बुडेल. लाखो कर्मचारी व त्यांचे प्रपंच विस्थापित होतील. यासाठी नवे उद्योग निर्माण करणे अविरत सुरु राहिले पाहिजेत"

राजकर्त्यांनी जो दूरगामी विचार करायचा तो स्व. रतनजी करायचे,असे उदाहरण दुर्मिळ असेल.स्व. रतनजी उद्योगपती होते. पण धनाचे हावरट नव्हते. मिळालेल्या धनातून ते समाजकार्य करायचे. टाटा मेमोरिअल हॉस्पिटल हे त्याचे जीवंत उदाहरण. अनेक शैक्षणिक संस्था,वसतीगृहे त्यांनी उभारली. सामाजिक भान सदैव राखले.रतनजी ख-या अर्थाने भारताचे रत्न होते. उद्योगपती कसा असावा याचा वस्तुपाठ होते. विनय,विवेक,विनम्रता त्यांच्या ठायी होते. वसंत कानेटकरांच्या नाटकातील ते वक्तव्य त्यांनी प्रत्यक्षात आणले.भगवे कपडेधारीच संन्यासी असतातच असे नव्हे.उलट आनेक भगवे वस्त्रधारी भुलथापा मारुन,अंधश्रध्दा,जादूटोण्याचा वापर करुन असहाय लोकांना लुटून कोट्यधीश बनलेत. तर एक उद्योगपती,करोडोपतीही संन्यासी असू शकतो हे रतनजींनी कृतीतून सिध्द केले.अशा या संन्यस्त उद्योगपतीस भावपूर्ण श्रध्दांजली

– भास्कर खंडागळे

## महापुरुषांचा कधीच मृत्यू होत नाही



आनंद महिंद्रा यांनी रतन टाटा यांचा फोटो शेअर करत सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट केली आहे की, मी रतन टाटा यांची अनुपस्थिती स्वीकारण्यास असमर्थ आहे. भारताची अर्थव्यवस्था ऐतिहासिक झेप घेण्याच्या उंबरठ्यावर उभी आहे. या काळात रतन टाटा यांचे मार्गदर्शन बहुमोल ठरले असते. आपण फक्त त्याच्या उदाहरणाचे अनुकरण करण्यासाठी वचनबद्ध आहोत. गुडबाय आणि गॉडस्पीड, श्री टी. तुम्हाला कधीच विसरले जाणार नाही. कारण महापुरुषांचा कधीच मृत्यू होत नाही.

– आनंद महिंद्रा

## टिक टिक थांबली, टायटानचे निधन



प्रख्यात हर्ष गोयंका यांनी आपल्या एक्स पोस्टमध्ये म्हटले आहे की, घड्याळाची टिक टिक थांबली आहे. टायटनचे निधन झाले. #रतन टाटा हे सचोटीचे, नैतिक नेतृत्वाचे आणि परोपकाराचे उदाहरण होते, ज्यांनी व्यवसायाच्या जगावर आणि त्याहूनही पुढे एक अमिट छाप सोडली आहे. ते नेहमीच आमच्या आठणीत राहतील.

– हर्ष गोयंका

## त्यांच्या जाण्याने मी आयुष्यातील ध्रुवतारा गमावला



मी कधी जमशेटजी टाटा किंवा दोराबजी टाटा यांना बघितले नाही. अनेक लोक सांगायचे की, ते कमालीचे साधे आणि मूल्य जपणारे होते. मात्र, मी माझ्या आयुष्यात रतन टाटा यांना पाहिले. रतन टाटा हे साधे राहणीमान आणि सचोटीने मूल्य जपणारे व्यक्ती होते. त्यांना इतरांविषयी काळजी असायची. ते नव्या कल्पनांचे स्वागत करायचे. त्यांच्या जाण्याने उद्योग जगतातील एका पर्वाचा अंत झाला आहे. त्यांची जीभ शुद्ध होती. त्यांच्याकडे कमालीचा संयम होता. त्यांच्या जाण्याने मी आयुष्यातील ध्रुवतारा गमावल्यासारखे वाटत आहे, अशी भावना सुधा मूर्ती यांनी व्यक्त केली.

– सुधा मूर्ती

## एका युगाचा अंत



रतन टाटा अतिशय आदरणीय आणि नम्र व्यक्ती होते. अफाट दूरदृष्टी आणि राष्ट्रासाठी सर्वोत्कृष्ट कार्य करण्याचा त्यांचा निर्धार हा नेहमीच अभिमानास्पद. अनेक वेळा आम्ही काही प्रोजेक्ट्सवर एकत्र सहभागी होतो त्यांच्यासोबत अनेक अद्भुत क्षण घालवण्याची संधी मिळाली. एका युगाचा अंत झाला आहे. आजचा खूप दु:खद दिवस, असे म्हणत अमिताभ बच्चन यांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत आपल्या भावना व्यक्त करताना रतन टाटांना श्रद्धांजली वाहिली आहे. त्यांनी रतन टाटा यांच्यासोबतचा एक फोटो शेअर केला आहे.

– अमिताभ बच्चन

## शाश्वत भारतीय मूल्यांचे मूर्त रूप



आधुनिक व्यवस्थापकीय तत्वांचा अंगीकार करताना रतन टाटा यांनी समूह संस्थापकांच्या दृष्टिकोनाबाबत कधीही तडजोड न करता टाटा समूहाला एक विश्वसनीय भारतीय जागतिक ब्रांड म्हणून प्रस्थापित केले. १४० कोटी लोकसंख्या असलेल्या आपल्या देशातील प्रत्येक व्यक्तीचे जीवन टाटा समूहाने आपल्या उत्पादन व सेवेच्या माध्यमातून स्पर्शले, याचे श्रेय जसे टाटा समूहाचे आहे, तसेच ते रतन टाटा यांच्या व्यापक दृष्टीचे देखील आहे. अनेक क्षेत्रात नीती मूल्यांशी तडजोड होत असताना देखील रतन टाटा यांनी वैयक्तिक, सामाजिक आणि व्यावसायिक जीवनात शाश्वत भारतीय नीतीमूल्यांची कसोशीने जपणूक केली.

– राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

## रतन टाटा म्हणजे दुसरे श्रीमंत योगी



जवळपास १५६ वर्षांची परंपरा असलेल्या एका उद्योग समूहाला ज्यांनी खऱ्या अर्थाने एकविसाव्या शतकांत आणलं आणि 'टाटा' ही नाममुद्रा ज्यांनी जगभर नेली ती रतन टाटांनी. बरं, हे सगळं करताना एखाद्या योगी माणसाची स्थितप्रज्ञताच ठेवायची ही टाटा समूहाची शिकवण पूर्णपणे अंगीकारायची हे खरंतर कठीण, पण ते रतन टाटांना जमलं. भारताने कदाचित शेवटचा असा 'कर्तृत्ववान तरीही निर्लेप राहिलेला उद्योजक' गमावला, हे त्याहून मोठं दु:ख. छत्रपती शिवाजी महाराजांशी या जगात कोणाचीच तुलना होऊ शकत नाही. पण समर्थ रामदास स्वामींनी महाराजांचं वर्णन जसं अचूक केलं आहे तसं इतर कुठे आढळत नाही. त्यात त्यांनी महाराजांना 'श्रीमंत योगी' म्हणले आहे, रतन टाटांबद्दल विचार करताना, 'श्रीमंत योगी' ही उपमा तंतोतंत पटते. पण श्रीमंत असून देखील त्यांनी आपल्या श्रीमंतीचा तमाशा कधी मांडला नाही. असा माणूस पुढच्या पिढयांना पहायला न मिळणं ही अधिक दु:खाची बाब आहे. – राज ठाकरे

## रतनजी हे एक राष्ट्रभक्त



रतन टाटा हे एक अमूल्य रत्न होते. प्रसिद्ध उद्योगपती आणि समाजसेवक असलेले रतनजी हे एक राष्ट्रभक्त होते भारतीय औद्योगिक क्षेत्राच्या विकासामध्ये त्यांनी संपूर्ण योगदान दिले. तरुण पिढीला प्रोत्साहित केले. भारतीय अर्थव्यवस्थेला उच्च शिखरावर नेऊन ठेवले. रतन टाटा हे शिस्तप्रिय आणि प्रामाणिक होते साधं आणि निस्पृह जीवन जगणाऱ्या रतन टाटा यांना राष्ट्रसेविका समितीतर्फे विनम्र श्रद्धांजली

– राष्ट्रसेविका समिती चीफ शांतक्का

## टाटांनी आधुनिक भारताचा मार्ग पुन्हा परिभाषित केला



'आधुनिक भारताचा मार्ग नव्याने परिभाषित करणारा एक महान आणि दूरदर्शी माणूस भारताने गमावला आहे. टाटा हे केवळ एक व्यावसायिक नेते नव्हते, तर त्यांनी भारताच्या भावनेला अखंडता, करुणा आणि अधिक चांगल्यासाठी अतूट बांधिलकीने मूर्त रूप दिले. त्यांच्यासारखे महान पुरुष कधीच नाहीसे होत नाहीत. ..

– गौतम अदानी

## रतन तुम्ही नेहमीच माझ्या हृदयात राहाल



रतन टाटा हे भारताचे किर्तीवंत, दयाळू ह्दयाचे सुपूत्र होते, असं म्हटलं आहे. भारतासाठी आणि भारताच्या उद्योग विश्वासाठी हा दु:खद दिवस आहे असं मुकेश अंबानी यांनी म्हटलं आहे. रतन टाटा यांचं जाणं ही फक्त टाटा समूहाची नाही, तर प्रत्येक भारतीयाची हानी आहे असं मुकेश अंबानी यांनी आपल्या शोक संदेशात म्हणाले आहेत. 'रतन तुम्ही नेहमीच माझ्या ह्दयात राहाल' अशी प्रतिक्रिया उदयोगपती मुकेश अंबानी यांनी व्यक्त केली आहे.

– मुकेश अंबानी

## गुडबाय, माय डियर लाईटहाऊस..



रतन टाटा हे केवळ त्यांच्या कुशल व्यावसायिक नेतृत्वासाठीच नव्हे तर त्यांच्या महत्त्वपूर्ण परोपकारी योगदानासाठीही प्रसिद्ध होते. त्यांच्या नंतरच्या काळात, त्यांचे विश्वासू सहाय्यक शंतनू नायडू यांच्याशी त्यांच्या जवळच्या संबंधांनी लोकांचे लक्ष वेधून घेतलं आहे. रतन टाटा यांच्या निधनानंतर शंतनू यांनी सकाळी एक पोस्ट करत आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. त्यांच्या मैत्रीने माझ्या आत एक पोकळी सोडली आहे, ती भरून काढण्याच्या प्रयत्नात मी आयुष्य घालवणार आहे. दु:ख ही प्रेमाची किंमत आहे. गुडबाय, माय डियर लाईटहाऊस," असे २८ वर्षीय शंतनू नायडू यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

– शंतनू नायडू

## तेव्हा तीन तास टाटांसोबत वेळ घालवता आला



अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा जेव्हा भारतात आले होते. तेव्हा मला रतन टाटा यांच्यासोबत तीन तास वेळ घालवण्याची संधी मिळाली.ओबामा यांच्यासोबत स्नेहभोजन आयोजित करण्यात आले होते. तेव्हा जेवताना रतन टाटा यांच्या शेजारी माझी बसण्याची व्यवस्था होती. तेव्हा त्यांच्याशी माझी विविद मुद्द्यांवर चर्चा झाली. त्यांच्यासोबत हा वेळ घालवता आला. हे माझे भाग्य आहे, अशी प्रतिक्रिया खासदार सुप्रिया सुळे यांनी दिली.

– सुप्रिया सुळे

# अडीच हजार घरकुलांना मंजुरी

## डॉ.योगेश क्षीरसागर : मंत्री धनंजय मुंडेंची भूमिका

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेतून बीड विधानसभा मतदारसंघातील विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील नागरिकांसाठी तब्बल अडीच हजार घरकुलांना राज्य शासनाने बुधवारी (दि.९) मंजुरी दिली. पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या आग्रही मागणीमुळे विभागाचे मंत्री ना.अतुल सावे यांनी हा निर्णय घेतला. त्याबद्दल दोघांचेही राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी आभार मानले आहेत.

यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेतून बीड जिल्ह्यात तब्बल २८ हजार घरकुलांना मंजुरी मिळाली आहे. त्यामध्ये बीड विधानसभा मतदारसंघातील बीड तालुक्यातून १५०० तर शिरूर कासार तालुक्यातून १००० हून अधिक अशा एकूण २ हजार ५०० घरकुलांचा समावेश आहे. या सर्व लाभार्थ्यांना योजनेतून स्वतःचे पक्के घर बांधण्यासाठी प्रत्येकी १ लाख २० हजार रुपये निधी मिळणार आहे. यापूर्वी पक्षाचे प्रमुख पदाधिकारी, मतदारसंघातील अनेक सरपंचांनी हजारो घरकुलाचे प्रस्ताव पंचायत समितीमार्फत दाखल केले होते. त्यातून जिल्हास्तरीय समितीने पात्र प्रस्ताव शासनाकडे पाठविले. परंतु अनेक महिन्यांपासून मंजुरीसाठी प्रलंबित असल्याने सरपंचांकडून सातत्याने मंजुरीची मागणी होत होती. या मागणीची दखल घेऊन पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या पुढाकारातून इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे मंत्री ना.अतुल सावे यांनी रेकॉर्डब्रेक २८ हजार घरकुलांना मंजुरी दिली. यात बीड विधानसभा मतदारसंघातील तब्बल अडीच हजार घरकुलांचा प्रश्न मार्गी लागल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.




### पालकमंत्र्यांना भेटून सरपंच आभार मानणार

बीड विधानसभा मतदारसंघातील अनेक गावातून घरकुलांचे प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित होते. परंतु अनेक हेलपाटे मारून मंजुरी मिळत नव्हती. अखेर पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांनी घरकुलांचा प्रश्न मार्गी लावला असून डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली अनेक सरपंच हे ना.मुंडे यांची भेट घेऊन आभार मानणार असल्याचे सांगितले आहे.

# सिरसाळा बसस्थानकाचा मार्ग मोकळा

## धनंजय मुंडे:शासन निर्णय झाला निर्गमित

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी तालुक्यातील सिरसाळा येथे एस टी बसस्थानक उभारणी साठी जागेचा प्रश्न आज पालकमंत्री तथा कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून मार्गी लागला असून, बसस्थानक साठी कृषी विभागाच्या ताब्यात असलेली व सध्या वापरात नसलेली २ एकर जागा महसूल मार्फत राज्य परिवहन महामंडळाला हस्तांतरित करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय आज निर्गमित करण्यात आला आहे.

कृषी विभागाचे सन १९९६ सालचे कृषी तंत्रज्ञान केंद्र या जागेत होते. मात्र त्याचा कालावधी संपून ही जागा सध्या वापरात नव्हती. बस स्थानकास सिरसाळा गाव भागात अन्यत्र जागा उपलब्ध नसल्याने बसस्थानाकाचे का रखडले होते.याचाच विचार करून धनंजय मुंडे यांनी जिल्हा कृषी कार्यालयामार्फत सदर जागेपैकी २ एकर जागा परिवहन विभागास हस्तांतरित करण्याचा परिपूर्ण प्रस्ताव मागवून तो मंजूर केला आहे, त्यामुळे आता सिरसाळा येथे बसस्थानक उभारणीची वाट मोकळी झाली आहे. या जागेत बसस्थानक उभारणीचा प्रस्ताव राज्य परिवहन महामंडळाकडून मंजूर करून याठिकाणी भव्य बसस्थानक उभारणीचे काम लवकरच सुरू केले जाईल, अशी माहिती पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे.



# महाराष्ट्र सर्वांगीण विकासाची दूरदृष्टी

## राजेभाऊ फड : युवकांचा राष्ट्रवादीत प्रवेश

परळी /पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी शहरातील इंदिरा नगर येथील युवक कार्यकर्ते सनी भाऊ कसबे यांच्यासह अनेक युवकांनी बुधवारी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात जाहीर प्रवेश केला. युवक नेते राजेभाऊ फड यांनी सर्व युवकांना गळ्यात रुमाल टाकून प्रवेश दिला. पक्षाचे सर्वेसर्वा शरदचंद्र पवार यांचा पुरोगामी विचार सर्वांनी पुढे घेऊन जायचा असून, महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाची दूरदृष्टी फक्त जाणते राजे शरदचंद्र पवार यांच्याकडे असल्याचे प्रतिपादन यावेळी बोलत असताना आणि मार्गदर्शन करत असताना राजेभाऊ फड यांनी केले. तर सनी भाऊ कसबे म्हणाले की, आम्ही पक्षाचा विचार तळागाळातील लोकांपर्यंत घेऊन जाऊन पक्षाच्या वाढीसाठी सर्वांना सोबत घेऊन जोमाने काम करू व आगामी निवडणुकीत ताकदीने काम करू असे विचार व्यक्त केले.




इंदिरा नगर भागातील युवक कार्यकर्ते सनी भाऊ कसबे, विकास खंडाळे, गौतम कसबे, निलेश आचार्य, धम्मा कांबळे, दादाराव कसबे, सौरभ होके, मुंजा होके, छोटू व्हावळे, निलेश कसबे, दानिश होके, निखिल कसबे, बाळू व्हावळे, पृथ्वीराज रायभोळे, समाधान सावंत, प्रेम लोखंडे, अमित गोडबोले, लखन जगताप, साहील आचार्य यांच्यासह अनेकांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षात जाहीर प्रवेश केला. युवक नेते राजेभाऊ फड यांनी पक्षाचा रुमाल गळ्यात टाकून सर्वांना प्रवेश दिला

पान २ वर...



### राज्यपालांकडे मांडले प्रश्न

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्यपाल सी पी राधाकृष्णन बीड दौऱ्या वेळी असताना त्यांच्या सोबत च्या बैठकी दरम्यान आजाद समाज पार्टी कांशीराम बीड च्या वतीने बीड जिल्हाध्यक्ष आशिषकुमार चव्हाण यांनी बीड रेल्वे स्टेशन ला डॉ.बाबासाहेब आंबेडकर नाव देण्यात यावे तसेच रमाई घरकुल योजना रकमेची मर्यादा वाढून पाच लाख करावी व एन एस एफ डी सी.महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळ व इतर मागास वर्गीय महामंडळाचा इतर योजनेत वळवलेला निधी परत देऊन त्याची मर्यादा एक हजार कोटी करावी अशा मागण्या करण्यात आल्या.

# मुस्लिमांना उमेदवारी देऊन न्याय द्या?

## पडघम:शेख मंजुर यांची उमेदवारीची मागणी

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सर्वे सर्वा शरदचंद्रजी पवार साहेब हे बीड जिल्ह्यातून विधानसभेसाठी मुस्लिम समाजाचा एक तरी उमेदवार देऊन मुस्लिम समाजाला न्याय द्यावा अशी मागणी समाजातून केली जात आहे. राष्ट्रवादी शरद चंद्र पवार पार्टी कडून बीड जिल्ह्यातील एक विधानसभा मतदारसंघ मुस्लिम उमेदवार साठी सोडतील का? त्यापैकी जिल्ह्यातील माजलगाव मतदार संघातून माजी नगराध्यक्ष शेख मंजूर यांना राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पार्टीकडे उमेदवारी मागितल्याचे कळते. पवार साहेब मुस्लिम समाजातील निष्ठावंत कार्यकर्त्यांना न्याय देतील का?

गेल्या लोकसभेला बजरंग बप्पा सोनवणे यांना विजयी करण्यामध्ये बीड जिल्ह्यातील मुस्लिम समाजाचा सिंहाचा वाटा आहे बीड व माजलगाव या मतदारसंघांमध्ये मुस्लिम समाजाची मतदानाची टक्केवारी जर पाहिली तर बीड नंतर माजलगाव मतदार संघामध्ये मुस्लिमांची मतदार संख्या ५० ते ५५ हजार आहे राष्ट्रवादी पार्टी कडून माजलगाव मतदार संघामध्ये शेख मंजूर यांनी उमेदवारी मागितली आहे. जर मतदारांच्या गणिताची जुळवा- जुळव केल्यास जिल्ह्यातील विजयी उमेदवारांमध्ये माजलगावच्या विजयी उमेदवाराची भर निश्चित पडल्याशिवाय राहणार नाही. अशीच स्थिती निर्माण झाली आहे. बीड लोकसभा मतदार मतदार संघातून बजरंग बप्पा सोनवणे हे थोड्या बहुत लीडने निवडून आले हे जरी खरे असले तरी जिल्ह्यातील विरोधी पक्षाला माहित आहे की मुस्लिम

पान २ वर...



### मुस्लिम समाजाला उमेदवारी वाटा द्या

लोकसभेच्या निवडणुकीमध्ये मुस्लिम समाज बांधवांनी एकजुटीने भाजपाच्या विरोधामध्ये मतदान करून एक ऐतिहासिक निर्णय घेतलेला आहे परंतु होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये बीड जिल्ह्यात मुस्लिम समाजाला प्रतिनिधित्व देऊन न्याय द्यावा अन्यथा लोकसभेप्रमाणे या पक्षाला लोक मतदान करतीलच अशी परिस्थिती जिल्ह्यात नाही अशी चर्चा मुस्लिम समाज बांधवांमध्ये होताना दिसत आहे.

# गेवराईची जागा महाविकास आघाडीला

## अण्णासाहेब राठोड:बीडवर विशेषतः लक्ष केंद्रित



गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीनंततर पुर्वीपासून पक्षाचा मजबुत गड असलेल्या बीड जिल्ह्यावर शरद पवारांनी विशेष लक्ष केंद्रीत केले आहे. लोकसभा निवडणुकीत महायुतीला पहिला दणका दिल्यानंतर आता विधानसभेत दुसरा डाव टाकण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार मैदानात उतरले आहेत. अजित पवारांच्या बंडाला साथ देणारे जिल्ह्यातील धनंजय मुंडे, प्रकाश सोळंके, अमरसिंह पंडित यांचा करेक्ट कार्यक्रम करण्यासाठी उमेदवारांचा शोध सुरू आहे. तसेच गेवराई विधानसभेसाठी महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार यांच्या गटाला सुटण्याची शक्यता आहे. त्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे गेवराई तालुकाध्यक्ष अण्णासाहेब राठोड यांनी नुकतेच प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची भेट घेऊन महाविकास आघाडीकडून गेवराई विधानसभेसाठी जागा सोडविण्यासाठी विनंती केली आहे. पक्ष फुटी नंतर अवघ्या १२ ते १३ महिन्यांमध्ये प्रत्येक सर्कलमध्ये पक्ष संघटना मजबूत करून संपूर्ण तालुक्यामध्ये पक्षाचे जाळे निर्माण केल्यामुळे लोकसभा निवडणुकीमध्ये गेवराई विधानसभा मतदारसंघातून

पान २ वर...

# केज स्मार्ट श्रीमती स्पर्धेला प्रतिसाद!

## स्पर्धा: रेश्मा बांगर विजेत्या तर उपविजेत्या सुनीता राऊत

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज रोटरी तर्फे दरवर्षी नवरात्र महोत्सवानिमित्त घेतल्या जाणाऱ्या केज स्मार्ट श्रीमती स्पर्धेत केजच्या रेश्मा जीवन बांगर यांनी प्रथम क्रमांक मिळवून केज स्मार्ट श्रीमती बनण्याचा बहुमान मिळवला तर सुनीता संतोष राऊत यांनी उपविजेतेपद पटकावले. विजेत्यांना डिस्ट्रिक्ट पब्लिक इमेज डायरेक्टर रवींद्र बनकर, रो किशोर दाताळ, केज रोटरी अध्यक्ष प्रकाश कामाजी, हनुमंत भोसले, प्रवीण देशपांडे, अरुण अंजाण, दादाराव जमाले पाटील सुशील टोपे व नगराध्यक्षा सीता बनसोड यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले.

रोटरी क्लब ऑफ केज आणि भवानी माता उत्सव समितीच्या वतीने ही स्पर्धा मंगळवारी भवानी मंदिर प्रांगणात पार पडली. या स्पर्धेत विविध खेळाच्या स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत २०० महिलांनी सहभाग नोंदवला होता.

निवडफेरी सह इतर चार फेऱ्यानंतर अंतिम फेरी पार पडली. या स्पर्धेत २० पैकी १९ गुण मिळवून रेश्मा जीवन बांगर या प्रथम स्थानी आल्या तर सुनीता संतोष




राऊत या दुसऱ्या क्रमांकावर राहिल्या. या स्पर्धेत केजची मयुरी संतोष राऊत या केजच्या कन्येने आपल्या नोकरीच्या पहिल्या पगारातून पहिल्या चार विजेत्यांना चार पैठणी भेट दिल्या. याबद्दल तिचे कौतुक होत आहे. या स्पर्धेसाठी गिरीराज कलेक्शन, मैत्री कलेक्शन, अभिजित कलेक्शन, कोहिनुर कलेक्शन, अतुल प्रोव्हिजन्स, पांडुरंग मिटकरी, सुरभी एम्पोरियम, पारस मयूर स्वीट होम, व्यंकटेश स्टील सेंटर यांनी विजेत्यांना भेटवस्तू दिल्या. हनुमंत भोसले यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष प्रकाश कामाजी यांच्यासह रो अरुण अंजाण, दादाराव जमाले पाटील, प्रवीण देशपांडे, सूर्यकांत चवरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

पान २ वर...

# परळी रुग्णालयात सुविधा मिळाव्यात

## निवेदन: आंबेडकरी अनुयायांची मागणी



परळी/ पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी उपजिल्हा रुग्णालयात आरोग्याच्या दृष्टीने अत्यावश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी शहरातील आंबेडकरी अनुयायांच्या वतीने आज एका निवेदनाद्वारे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अरुण गुट्टे यांना करण्यात आली आहे.

याबाबत दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, परळी तालुक्यात हृदयविकार, अस्थिरोग रुग्णांमध्ये प्रचंड वाढ झालेली, आहे सदर आजाराचे रुग्ण परळी उपजिल्हा रुग्णालयात मोठ्या संख्येने येत आहेत. परंतु संबंधित डॉक्टर उपलब्ध नसल्याने त्यांची गैरसोय होत आहे व अनेक जण दगावत आहेत. त्यामुळे फिजिशियन, हृदयरोग तज्ञ, अस्थिरोग तज्ञ यांची तात्काळ नियुक्ती करण्यात यावी .आगामी सात दिवसात यावर योग्य ती कारवाई करावी अन्यथा आंबेडकरी अनुयायांच्या वतीने आंदोलन करण्याचा इशारा यावेळी निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. या निवेदनावर आंबेडकरी समाजाचे सोपान ताटे ,गणपत आप्पा बनसोडे, मिलिंद घाडगे, महेंद्र रोडे, रवी मुळे,माधव ताटे,गौतम आगळे, सुभाष वाघमारे, बालासाहेब जगतकर, विश्वनाथ रोडे, सुनील चिकाटे, संजय जगतकर, नागेश वाव्हळे ,बबन कांबळे, रमेश रायभोळे, विकास वाघमारे, विश्वजीत कांबळे, अनिल कांबळे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## शिवराज पवार : २५ कोटी रुपये निधीच्या रस्ता कांमाचे उदघाटन

# विकासासाठी आम्ही कटिबद्ध आहोत

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

मतदारसंघातील जनतेने बाळराजे पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आ.लक्ष्मण आण्णा पवार यांनी गेवराई मतदारसंघातील रस्त्याच्या माध्यमातून जनतेचा दळणवळणाचा प्रश्न मार्गी लावत मतदारसंघात जलसिंचन व्हावे म्हणून आ.लक्ष्मण पवार यांनी जलयुक्त शिवार योजनेंतर्गत मतदारसंघात अनेक गावांत असलेल्या नद्यांवर खोलीकरण, रुदीकरण,करत अनेक दर्जेदार सिमेंट बंधारे उभारून अनेक गावांना पाणीदार करण्यासाठीच पारदर्शक काम केले आहे, गेवराई मतदारसंघातील वीज वितरण व्यवस्था सुरळीत करण्यासाठी अनेक ३३ केव्ही केंद्राची उभारून ग्रामीण भागातील अनेक गावांचा अंधार दूर करण्यासाठी प्रमाणिक प्रयत्न केले आहे




मतदारसंघात आ.लक्ष्मण पवार यांच्या प्रयत्नातून मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आ.लक्ष्मण पवार यांनी मोठ्या प्रमाणात निधी खेचून आणुन मोठ्या प्रमाणात विकास कामे सध्या मतदारसंघात सुरुच आहे आण्णांनच्या नेतृत्वाखालील मतदारसंघातील सर्वागिण विकासाठी आम्ही कटिबद्ध .त्या अनुषंगानेच मतदारसंघातील माजलगाव तालुक्यातील राममा ६१ ते हारकी निमगाव,रामपिंपळगाव,मगरुळ २, ६ की.मी. किंमत ६

पान २ वर...

# महाराष्ट्र परिवर्तनाचे नायक

## विजय साळवे : माजलगाव येथे सत्कार समारंभ

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सध्या महाराष्ट्रात राजकिय वातावरण बिघडत चाललेले असून राजकारण हे मनूवाद्याच्या दावणीला बांधले गेले आहे. महाराष्ट्रातील घराणेशाहीचा वारसा चालवणाऱ्यांचा आता अंत केल्या शिवाय पर्याय नाही. व मनूवाद्याच्या दावणीला बांधलेली राजकीय वर्तुळाचे महाराष्ट्रात जरांगे पाटील व डॉ.राजरत्न आंबेडकर साहेब हे परिवर्तन घडवून आणल्या शिवाय स्वस्त बसणार नाहीत. तेचं सध्या महाराष्ट्रात राजकिय परिवर्तनाचे नायक असून आपण त्यांच्या पाठीशी खंबीरपणे तुम्ही आम्ही उभे राहूच व या दोघांचे हात बळकट करू या असे प्रतिपादन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चे जिल्हाध्यक्ष विजय साळवे यांनी सत्काराला उत्तर देताना बोलत होते.



यावेळी कार्यक्रमाच्या निमित्ताने डॉ.उध्दव नाईकनवरे, अभय होके पाटील , मनोज फरके , आदी मान्यवर

पान २ वर...